बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०

साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे




गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध

आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१४ गोंदिया | अंक ०४ | बुधवार,दि.०१ जानेवारी २०२५ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024

# वर्षभरात राज्यातील २२ वाघांचा मृत्यू

**गोंदिया:-** राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाच्या आकडेवारीनुसार देशभरात १२४ तर महाराष्ट्रात २२ वाघ मृत्युमुखी पडले. प्रत्यक्षात ही आकडेवारी जास्त असल्याचा अंदाज वन्यजीवप्रेमींचा आहे. मध्य प्रदेशात तब्बल ४६ वाघ मृत्युमुखी पडले. या वर्षात वाघांचे नैसर्गिक मृत्यू कमी आणि रस्ते अपघात व इतर वर्षांतील वाघांचे मृत्यू हे वन्यजीवांच्या झुंजीत, अपघातात, शिकार वा नैसर्गिकरित्या अशा विविध कारणांनी झाले आहेत. यावर्षीदेखील शिकारीच्या घटना समोर आल्या आहेत. काही प्रकरणातील चौकशी सुरू आहे. वाघांचे अपघाती मृत्यू आणि संशयास्पद मृत्यूचे प्रमाण देखील जास्त आहे.

भंडारा वनविभागाअंतर्गत येणाऱ्या लेंडेझरी वनक्षेत्रातील देवनारा कक्ष क्र. ६२ मध्ये वाघ मृतावस्थेत आढळून आला. घटनेची माहिती मिळताच वनाधिकारी आणि कर्मचारी घटनास्थळी पोहोचले. वाघाचा मृत्यू वाहनाच्या धडकेत झाला असावा असा प्राथमिक अंदाज आहे.१४ ते १६ महिने वय असलेल्या वाघाच्या मागच्या पायाला मार लागलेला होता. आतडे तुटलेले होते आणि मानेला प्रचंड मार लागला होता. त्यामुळे हलक्या वाहनाने वाघाला रस्त्यावर धडक दिली असावी,



असा अंदाज आहे.

मेळघाट प्रादेशिक चिचपल्ली वनविभागाच्या परतवाडा अंतर्गत येणाऱ्या चिखलदरा तालुक्यातील अंजनगाव सुर्जी वनपरिक्षेत्रात वाघ मृत अवस्थेत आढळून आला. यात वाघाचे तीन पंजे नव्हते व एक पंजाला नख नव्हते. चंद्रपूर जिल्ह्यातदेखील वनपरिक्षेत्राच्या मूल उपक्षेत्रातील चिरोली नियतक्षेत्रांतर्गत नलेश्वर येथे वाघाच्या शिकारीचे एक प्रकरण मे महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात उघडकीस आले होते.

जिवंत विद्युत प्रवाहाचा धक्का लागून पाच महिन्यांपूर्वी या वाघाचा मृत्यू झाला होता. तीन दिवस कुऱ्हाडीच्या सहाय्याने तुकडे करून या वाघाचे अवयव जाळण्यात आले. ३० डिसेंबरला चंद्रपूर-मूल मार्गावरील लोहारा येथे वनविभागाने चार वाघ नखांसह दोघांना अटक केली.

# गटार योजनेला सापडेना मुहूर्त

## ९ वर्षानंतरही दुसऱ्य टप्प्यासाठी गटांगळ्या, १२५ कोटींची योजना पोहोचली २५० कोटींवर

**गोंदिया:-** केंद्र शासन पुरस्कृत अमृत योजनेंतर्गत शहरातील मलनिस्सारणाचा प्रश्न मार्गी लावण्याकरिता २०१३ मध्ये १२५.७२ कोटी रुपयांच्या भूमिगत गटार योजनेला मंजुरी देण्यात आली. मात्र ही योजना समन्वयाचा अभाव आणि जागेची निवड न झाल्याने रखडली होती. ती योजना आजघडीला २५० कोटी रुपयांवर जाऊन पोहोचली. पहिल्या टप्प्याचे बांधकाम पूर्ण झाले. ते काम वादतील ठरले तर दुसऱ्या टप्प्याचा मुहूर्त अद्यापही सापडलेला नाही. त्यामुळे पुन्हा निधी वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

### खड्ड्यांमुळे अनेक अपघात

**भूमिगत गटार योजनेची कामे शहरात करण्यात आली. रस्त्याच्या मधोमध नाली खोदून त्यात पाइप टाकण्यात आले. पाइप अत्यंत लहान असून भविष्यात मलनिस्सारणाचा प्रश्न अधिकच बिकट होणार आहे. रसत्याच्या मधोमध पाइपवर चेंबर टाकले जात असून ते चेंबरही रस्त्यापेक्षा उंच आहेत. त्यामुळे चारचाकी वाहन चालविताना अडचण होत आहे. त्याचप्रकारे रस्ता खोदून योग्यरित्या भराव केला नसल्यामुळे आता वाहनचलकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.**



गोंदिया शहरातील बहुचर्चित आणि बऱ्याच काळापासून प्रलंबित असलेली भूमिगत गटार योजना गत अनेक वर्षापासून रखडली आहे. शासन पुरस्कृत अमृत योजनेंतर्गत गोंदिया शहरासाठी भूमिगत गटार योजना मंजूर करण्यात आली होती. या योजनेत शहरातील गटांराच्या माध्यमातून गोळा केलेल्या सांडपाण्यावर आवश्यक प्रक्रिया करण्यासाठी मलसुद्धीकरण केंद्र तयार करण्यासाठी जागेचा अभाा व निकषाप्रमाणे जागा उपलब्ध होत नसल्याने या योजनेला अधिकच विलंब होत होता. मलशुद्धीकरण केंद्र उभारण्यासाठी पांगोली नदीजवळ खसरा क्र.३१५/१ येथे तयर करण्याचे नियोजन करण्यात आले. याबाबत आ.विनोद अग्रवाल यांनी विविध आढावा बैठकीतून जिल्ह्याचे पालकमंत्री, जिल्हाधिकारी तसेच मंत्रालयातही हा विषय रेटून धरला होता. शेवटी सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याच्या यंत्रणेसाठी जागा उपलब्ध करण्यात आली. गोंदिया शहरातील सांडपाण्याची व्यवस्था करण्यासाठी गटारांची व्यवस्था करण्यात आली. परंतु या खुल्या गटारीमुळे शहरात सर्वदूर दुर्गंधी, घाण व जमिनीचे वाद पुढे येऊ लागले. त्यामुळे शहरासाठी भूमिगत गटारांची व्यवस्था तयार करण्यासाठी नव्याने प्रस्ताव तयार करण्यात आला. सदर प्रकल्प केंद्र शासन पुरस्कृत जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियानांतर्गत, शहरी विकास विभागाने १८ जून २०१३ मध्ये १२५.७२ कोटी रुपये निधी मंजूर करण्यात आला. परंतु कमिशनखोरी आणि कामात दिरंगाई केल्याने प्रकल्प लांबत गेला आणि पुढे रद्द करण्याच्या मर्गावर होता. या योजनेला २ टप्प्यात पूर्ण केले जात आहे. ११ डिसेंबर २०१८ ला केंद्र पुरस्कृत अमृत योजनेच्या माध्यमाने पहिल्या टप्प्यात दक्षिण भागातील भूमिगत गटार योजनेसाठी १३०.६४ कोटी किमतीचे कंत्राटही काढण्यात आले. आज या प्रकल्पासाठी शासनाला २५० कोटींपेक्षा जास्त खर्च येणार आहे. यासाठी योजनेला पूर्ण करण्यासाठी जीवन प्राधिकरण विभागाची मदत घेण्यात आली. योजनेचे काम पूर्ण झाले आता दुसऱ्या टप्प्यातील कामाचा अद्याप पत्ता नाही. पहिल्या टप्प्यातील काम वादातील ठरले होते. आता दुसऱ्या टप्प्यातील कामाचे काय? उशीर होत असल्यामुळे प्रकल्पाची पुन्हा किंमत वाढणार तर नाही? अशी चर्चा सुरु झाली आहे.

# एकाचवेळी १३५ उमेदवारांना नोकरी

## जिल्हा परिषदेत अनुकंपा तत्वावर रुजू, पदभरतीत पारदर्शक कारभार



**गोंदिया:-** गत कित्येक वर्षापासून नोकरीच्या प्रतीक्षेत असलेल्या उमेदवारांना जिल्हा परिषदेने खुशखबरी दिली. वर्षाच्या शेवटी प्रतीक्षेत असलेल्या तब्बल १३५ उमेदवारांना विविध विभागांत कायमस्वरुपी नोकरी उपलब्ध करुन दिली. ही भरती अत्यंत पादर्शकपणे झाल्यामुळे नोकरीत लागलेल्या उमेदवारांत आनंदाचे वातावरण आहे.

जिल्हा परिषदेत विविध विभागांत कार्यरत कर्मचाऱ्यांचा मृत्यू झला होता. त्यांच्या पाल्यांनी अनुकंपा तत्वावर नोकरीकरिता जिल्हा परिषदेकडे अर्ज केले होते. आपल्या कधी नोकरीत समाविष्ट करुन घेतील, असा सवालदेखील उपस्थित करण्यात येत होता. अखेर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मुरुगानंथन एम. यांनी अनुकंपा उमेदवारांची पदभरती घेण्याचा निर्धार घेतला. सामान्य प्रशान विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी फनिंद्र कुतीरकर यांच्या सहकार्याने भरती प्रक्रिया राबविण्यात आली. यापुर्वी झालेल्या भरतीमध्ये मोठ्या प्रमाणात सावळागोंधळ झाला होता. त्यावरुन वादंगदेखील निर्माण झाले होते. मात्र पहिल्यांदाच पदभरती अत्यंत पारदर्शकरित्या घेण्यात आली. चार दिवसांपुर्वी पार पडलेल्या भरतीत अंगणवाडी पर्यवेक्षिका १, विस्तार अधिकारी पंचायत १, कनिष्ठ महाविद्यालय शिक्षक १. पशुधन पर्यवेक्षक २, कनिष्ठ अभियंता २, शिक्षणसेवक २, प्रयोगशाळा वैज्ञानिक १, आरोग्यसेवक ८, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक ११, ग्रामपंचायत अधिकारी ३३ अणि ७३ परिचर अशी एकूण १३५ पदे भरण्यात आली आहेत. ही भरती पादर्शकरित्या पार पडल्यामुळे उमेदवारांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

# होमिओपॅथी डॉक्टरांसाठी खूशखबर, ॲलोपॅथीची प्रॅक्टिस करण्यासंदर्भात मोठा निर्णय

**गोंदिया:-** होमिओपॅथीची प्रॅक्टिस करत असलेले डॉक्टर रुग्णांना ॲलोपॅथिक औषधे लिहून देऊ शकणार आहेत. त्यांना ॲलोपॅथीची प्रॅक्टिस करण्याची मुभा देणारे पत्रक अन्न आणि औषध प्रशासनाने काढले आहे. इंडियन मेडिकल असोसिएशनने (आयएमए) या निर्णयाला विरोध केला आहे.

**एक वर्षाचा कोर्स आवश्यक-**

होमिओपॅथीच्या ज्या डॉक्टरांनी शासनमान्य वैद्यकीय महाविद्यालयांतून "सर्टिफिकेट कोर्स इन मॉडर्न फार्माकॉलॉजी' हा एक वर्षाचा अभ्यासक्रम पूर्ण केला आहे, त्यांनाच ॲलोपॅथीची प्रॅक्टिस करता येणार आहे. होमिओपॅथी डॉक्टरांना ॲलोपॅथीची प्रॅक्टिस सुरू करू देण्याच्या निर्णयाविरोधात आम्ही यापूर्वीच कोर्टात गेलो होतो. अन्न व औषध प्रशासनाच्या या निर्णयाच्या विरोधातही आम्ही न्यायालयात दाद मागणार आहोत. एक वर्षाचा अभ्यासक्रम पूर्ण करायचा आणि ॲलोपॅथीची प्रॅक्टिस करण्यास परवानगी द्यायची, हे योग्य नाही, असे डॉ.संतोष कदम, अध्यक्ष, आयएमए (महाराष्ट्र) यांनी म्हटले आहे.

**१० हजार जणांनी पूर्ण केला अभ्यासक्रम**

अन्न व औषध प्रशासनाच्या पत्रकात नमूद आहे की, होमिओपॅथीच्या डॉक्टरांची अनेक वर्षांपासूनची मागणी पूर्ण झाली आहे. राज्यभरात ८० हजार होमिओपॅथी डॉक्टर आहेत. त्यातील दहा हजार जणांनी हा अभ्यासक्रम पूर्ण केला असून त्यांनाच ॲलोपॅथीची २० ते २२ औषधे लिहून देता येणार आहेत. होमिओपॅथी हा विषय आयुष संचालनालयाच्या अखत्यारित येतो. अनेक गावांमध्ये हे होमिओपॅथी डॉक्टर कार्यरत आहेत. त्यांना ॲलोपॅथीची औषधे लिहून देण्याची परवानगी देण्यात आल्याचे एका अधिकाऱ्याने सांगितले आहे.

# वाल्मिक कराड अखेर पोलिसांना शरण

**बीड-** केज तालुक्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील मुख्य संशयित आरोपी वाल्मिक कराड जवळपास २० ते २२ दिवसांनंतर स्वतःहून पोलिसांना शरण गेला आहे.

वाल्मिक कराड हा आता पुणे पोलिसांना आणि सीआयडीला शरण आला आहे.शरण येण्यापूर्वी त्याचा एक व्हिडिओ देखील समोर आला आहे.वाल्मिक कराडने आपल्याला राजकीय द्वेषापोटी गोवण्यात आल्याचा आरोप केला.संतोष देशमुख हत्या प्रकरणी माझा काही संबंध नाही,असं वाल्मिक कराडने म्हटलंय.सध्या कराड यांच्यावर फक्त खंडणीचा गुन्हा दाखल असून त्यांच्या अटकेनंतर आता पुढील तपास लवकरच केला जाईल.दरम्यान, संतोष देशमुख हत्या प्रकरणात आतापर्यंत चार आरोपींना अटक करण्यात आली आहे. जयराम चाटे, महेश केदार, प्रतीक घुले आणि विष्णू चाटे अशी या आरोपींची नावे आहेत. तर, मुख्य आरोपी सुदर्शन घुले, कृष्णा आंधळे आणि सुधीर सांगळे हे तिघे फरार आहेत.

# अन्न-औषध प्रशासनाचा कारभार भंडारा येथूनच

**गोंदिया:-** जिल्हा निर्माण होऊन २४ वर्षाचा कालावधी लोटल्यावरही जनतेच्या आरोग्याशी सरळ निगडीत असलेल्या अन्न व औषध प्रशासन विभागाचे पूर्णकालीन कार्यालय आतापर्यंत गोंदियात सुरु झाले नाही. त्यामुळे शासन जनतेच्या आरोग्याप्रती किती जागृत आहे, याची कल्पना केली जाऊ शकते.

गोंदिया जिल्ह्याची लोकसंख्या जवळपास १४ लाख आहे. परंतु या जिल्ह्यासाठी केवळ दोन अन्न निरीक्षक व एक औषध निरीक्षक ही पदे अत्यल्प आहे. अशातच एखाद्या घटनेची माहिती भंडारा कार्यालयातील अधिकाऱ्यांपर्यंत पोहचली तर ते गोंदियाला येईपर्यंत खूप वेळ निघून गेला असतो. गोंदिया जिल्ह्यातील अन्न व औषध प्रशासन विभागाचे कामकाज आजही भंडारा येथील कार्यालयातूनच चालविले जात आहे.

काही वर्षापूर्वी जनतेची मागणी पाहून गोंदिया येथे एक कॅम्प कार्यालय सुरु करण्यात आले होते. त्या कार्यालयासाठी एक सहायक आयुक्त (औषधी), एक सहायक आयुक्त (अन्न) व एक लिपीक या पदांना मंजुरी देण्यात आली होती. परंतु ही पदे आजपर्यंत



भरण्यात आली नाही. हे कार्यालय आठवड्यातून केवळ दोनच दिवस सुरु राहते. तर संपूर्ण कारभार भंडारा कार्यालयातून संचालित होतो.

उल्लेखनीय म्हणजे, भंडारा येथील कार्यालयात सुद्धा मंजूर करण्यात आलेली अनेक पदे रिक्त आहेत. भंडारा कार्यालयातील दोन अन्न निरीक्षक गोंदिया जिल्ह्याचा कारभार सांभाळत आहेत. तर औषधी निरीक्षकाला दोन्ही जिल्ह्याचा कारभार सांभाळावा लागत असल्याने ते इकडे लक्ष देत नाही. त्यामुळे जिल्ह्यातील जनतेशी निगडीत विभागाला सध्या कोणी वाली असल्याचे दिसून येत नाही. २४ वर्षानंतरही जनतेशी निगडीत अन्न व औषध प्रशासनाचे पूर्णकालीन कार्यालय जिल्ह्यात सुरु होऊ शकले नाही, तर याला शासनाचा उदासिनपणाच म्हणावा लागेल.

# शिवशाही बस अपघात महिनाभरानंतरही आठवणी ताज्याच

- अपघातातील ११ मृतापैकी ५ मृतांच्या नातेवाईकानाच मदत
- जखमी अद्यापही मदतीच्या प्रतिक्षेत
- प्रधानमंत्री मदत निधीची प्रशासनासह नातेवाईकाना वाट



**गोंदिया :-** २९ नोव्हेंबरचा तो दिवस... त्या शिवशाही बसमधील प्रवाशांसाठी काळ बनला... समोरून येणाऱ्या दुचाकीला वाचविण्याच्या प्रयत्नात भरधाव शिवशाही उलटली... अनब ११ प्रवाशांचा जीव गेला... २९ प्रवासी जखमी झाले... या घटनेने जिल्हा हादरून गेला... २९ डिसेंबर या घटनेला एक महिना पूर्ण झाला आहे... अजूनही या अपघाताच्या आठवणी अंगावर शहारे आणत आहेत... या अपघातात मृत पावलेल्या ११ प्रवाशांपैकी ६ प्रवाशांच्या नातेवाईकांना महिना लोटूनही अद्याप मदत मिळालेली नाही.त्यातच जखमींना राज्य परिवहन महामंडळाकडून व प्रधानमंत्री मदत निधीचीही रक्कम अद्याप पोचती झालेली नाही.

एमएच ०९/ ईएम १२७३ क्रमांकाची भंडारा आगाराची शिवशाही बस घेऊन चालक प्रणय रायपूरकर व वाहक नितीन मते हे भंडाऱ्याकडून गोंदियाच्या दिशेने निघाले होते. बसमधून एकूण ४० प्रवासी प्रवास करीत होते. सडक अर्जुनी तालुक्यातील डव्वा-खजरीलगच्या वृंदावनटोला फ्फ ाट्याजवळ समोरून येणाऱ्या एका दुचाकीचालकाला वाचविण्याचा प्रयत्न बसचालक प्रणय रायपूरकर याने केला. याकरिता त्याने करकचून ब्रेक दाबला. त्यामुळे भरधाव असलेली बस अनियंत्रित होऊन रस्त्यालगत असलेले बॅरिकेट्स तोडत बस वाहकाच्या बाजूला उलटली.

बसचा वेग इतका जास्त होता की बॅरिकेट्सचे काही खांब उखडून पडले. काही खांब वाकत गेले. बॅरिकेट्स प्रवाशांच्या सीटजवळून घासत गेले. अनब क्षणात शिवशाही बस उलटली. काही प्रवासी जिवाच्या आकांताने बसच्या मागील व पुढील काच तोडून बाहेर निघाले. या अपघातात ११ प्रवाशांचा मृत्यू झाला, तर २९ प्रवासी जखमी झाले होते.

घटनास्थळी जमलेल्या नागरिकांनी आणि शासकीय यंत्रणेने मतदकार्य सुरू करीत जखमींना रुग्णालयात हलविले. मृतदेह गोंदियाच्या केटीएस रुग्णालयात शवविच्छेदनगृहात होते. ईथे काही नातलगांनी हंबरडा फोडला. काहींचे अश्रू गोठले होते.

### पाच मृतांच्या कुटुंबांना आर्थिक मदत

**या अपघातात एकूण ११ प्रवाशांचा मृत्यू झाला. त्यापैकी पाच मृतांच्या कुटुंबीयांना शासनाने जाहीर केलेली आर्थिक मदत देण्यात आली. आणखी सहा कुटुंब मदतीच्या प्रतीक्षेत आहेत. कागदपत्रांच्या पूर्ततेअभावी मदतनिधी रखडला असून, कागदपत्रांची पूर्तता झाल्यावर संबंधित मृतांच्या कुटुंबीयांनाही आर्थिक मदत दिली जाईल, असे संबंधित विभागाचे म्हणणे आहे.**

### प्रधानमंत्री मदत निधी प्रकियेतच

**बस अपघातातील मृताच्या कुटुबियांना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी प्रधानमंत्री मदत निधीतून २ लाख रुपये व जखमींना ५० हजाराची मदत जाहीर केली होती. ती मदत रक्कम अद्यापही अपघातातील मृत व जखमींच्या नातेवाईकांना मिळालेली नाही. यासंदर्भात जिल्हा आपत्ती निवारण अधिकारी राजन चौबे यांना विचारणा केली असता ११ मृत प्रवाशी व १२ जखमी प्रवाशांचे नाव प्रधानमंत्री मदत निधीकरीता पाठविण्यात आले असून त्या नावाना मंजूरी मिळालेली आहे. त्यांची कागदपत्राची पडताळणीही झालेली असून येत्या काही दिवसात संबधितांच्या बँक खात्यावरच ही रक्कम प्रधानमंत्री मदत निधी कार्यालयाकडून पाठविण्यात येणार असल्याची माहिती दिली.**

या अपघातात कोणी पत्नी-पत्नी, कोणाच्या डोक्यावरचे छत उडाले. कुणाचे वडील, तर कोणाची आई मृत्यूमुखी पडली. ही घटना ज्या मार्गावर घडली, त्या मार्गावरून मार्गक्रमण करताना आजही अनेकांच्या अंगावर शहारे येतात. आठवणी ताज्या होतात.






## संपादकीय

# एक “अर्थपर्व” लयाला

डॉ. मनमोहन सिंग यांच्या निधनामुळे देशाने एक संयमी, कुशल आणि अभ्यासू अर्थतज्ज्ञ गमावला. मात्र उदारीकरणाचे जनक म्हणून त्यांची राजकारण आणि अर्थकारणात ख्याती राहील. देशाच्या विकासात, अडचणींमध्ये मोलाची भूमिका बजावणारा हा अर्थतज्ज्ञ इतिहासात अमर झाला. त्यांचे विचार, मनोगते आणि आर्थिक विषयांवरील सल्ले देश कधीच विसरणार नाही.

१९९०च्या दशकामध्ये भारतीय अर्थव्यवस्थेची धुरा खंबीरपणे सांभाळणाऱ्या डॉ. मनमोहन सिंग यांचे निधन झाल्याने देशाने एक महान अर्थतज्ज्ञ, द्रष्टा सुधारणावादी आणि जागतिक धुरंधर नेता गमावला. डॉ. मनमोहन सिंग विनयशीलता, सहनशीलता, सहिष्णुता आणि करुणेचे प्रतीक होते. भारताची आर्थिक सुधारणा घडवून आणणारे हे महान व्यक्तिमत्त्व येणाऱ्या पिढ्यांसाठी अक्षय्य प्रेरणास्त्रोत राहील. प्रकृतीच्या कारणास्तव डॉ. मनमोहन सिंग हे गेल्या काही वर्षांपासून राजकारणापासून दूर होते. १९९१ मध्ये देश आर्थिक संकटाशी सामना करत असताना त्यावेळचे अर्थमंत्री डॉ. मनमोहन सिंग यांनी देशाची बाजारपेठ जगासाठी खुली केली. त्यांनी खासगीकरण–उदारीकरण आणि जागतिकीकरणाचा मार्ग अवलंबला आणि देशाची अर्थव्यवस्थाही रुळावर आणली. डॉ. मनमोहन सिंग यांचा जन्म २६ सप्टेंबर १९३२ रोजी पाकिस्तानमधील गाह या गावी झाला. १९४७ मध्ये फाळणीदरम्यान विस्थापित होऊन सिंग कुटुंब भारतात आले. त्यानंतर त्यांनी पंजाब विद्यापीठातून पदवीपर्यंत शिक्षण घेतले. डॉ. मनमोहन सिंग यांनी ऑक्सफर्ड विद्यापीठातून अर्थशास्त्रात डॉक्टरेट घेतली. ते ३३ वर्षे खासदार होते. विद्वान, मृदू, मितभाषी आणि संवेदनशील नेता म्हणून डॉ. मनमोहन सिंग यांच्याकडे पाहिले जायचे. जवाहरलाल नेहरू आणि इंदिरा गांधी यांच्यानंतर ते पहिलेच असे पंतप्रधान होते, जे दहा वर्षे देशाचा राज्यकारभार सांभाळू शकले. २००४ ते २०१४ असे दहा वर्षं ते देशाचे पंतप्रधान होते. तसेच १९९८ ते २००४ या काळात ते राज्यसभेचे विरोधी पक्षनेतेही होते. तीन वर्षांपूर्वी म्हणजे १९९१ मध्ये डॉ. मनमोहन सिंग यांनी राज्यसभेच्या माध्यमातून आपल्या राजकीय कारकिर्दीची सुरुवात केली. चार महिन्यांतच त्यांनी माजी पंतप्रधान पी. व्ही. नरसिंह राव यांच्या मंत्रिमंडळात केंद्रीय अर्थमंत्री म्हणून शपथ घेतली.

१९६६ ते १९६९ या काळात डॉ. मनमोहन सिंग यांनी संयुक्त राष्ट्रात काम केले. नंतरच्या काळात ते भारत सरकारच्या वाणिज्य मंत्रालयात सल्लागार म्हणून रुजू झाले. १९७२ ते १९७६ या काळात भारत सरकारचे मुख्य आर्थिक सल्लागार म्हणून त्यांनी काम केले. १९८२ ते १९८५ या काळात त्यांनी रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर म्हणून काम केले. त्यानंतर १९८५ ते १९८७ या काळात त्यांनी नियोजन आयोगाचे उपाध्यक्ष म्हणून काम केले. १९९१ च्या आर्थिक संकटकाळी तत्कालीन पंतप्रधान नरसिंह राव यांच्याकडून डॉ. मनमोहन सिंग यांची अर्थमंत्रीपदी निवड करण्यात आली. अर्थमंत्री म्हणून डॉ. मनमोहन सिंग यांच्या कार्यकाळात अर्थव्यवस्थेचे उदारीकरण करण्यात आले. भारताला आर्थिक संकटातून बाहेर काढण्यात त्यांनी मोठी भूमिका पार पाडली. १९९६ मध्ये डॉ. मनमोहन सिंग हे राज्यसभेचे विरोधी पक्षनेते होते. २००४ मध्ये यूपीएची सत्ता आल्यानंतर त्यांनी देशाचे तेरावे पंतप्रधान म्हणून शपथ घेतली. पंतप्रधान पी. व्ही. नरसिंह राव यांच्या नेतृत्वाखाली अर्थमंत्री डॉ. मनमोहन सिंग यांच्या हस्ते नवीन आर्थिक धोरणाची औपचारिक सुरुवात करण्यात आली. अर्थव्यवस्थेवरील निर्बंध कमी करण्यासाठी आणि जागतिक आर्थिक परिदृश्यात भारताचे स्थान मजबूत करण्यासाठी धोरण तयार करण्यात आले. त्याद्वारे आर्थिक सुधारणांच्या दिशेने एक मोठे पाऊल म्हणून भारत सरकारने १९९१ मध्ये नवीन आर्थिक धोरण सादर केले.

जागतिक क्षेत्रात भारताची आर्थिक विश्वासार्हता वाढवण्यासाठी त्यांनी पावले उचलली. १९९१च्या भारताच्या नवीन आर्थिक धोरणाने परकीय चलनाचा साठा तयार करणे, बाजारातील निर्बंध दूर करणे आणि जगभरातील वस्तू, सेवा, भांडवल, मानव संसाधन आणि तंत्रज्ञानाची देवाण–घेवाण वाढवणे यावर लक्ष केंद्रित केले. यामुळे अर्थव्यवस्थेच्या वाढीला चालना मिळाली.

भारत सरकारने सप्टेंबर २००५ मध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा २००५ मंजूर केला. हा कायदा ग्रामीण कुटुंबातील प्रौढ सदस्यांना आर्थिक वर्षात शंभर दिवसांच्या मजुरीच्या रोजगाराची कायदेशीर हमी देतो. या कायद्याद्वारे रोजगाराची मागणी करणाऱ्या आणि अकुशल हाताने काम करण्यास इच्छुक असलेल्या ग्रामीण भागातील कुटुंबांना आर्थिक वर्षात शंभर दिवसांच्या रोजगाराची हमी दिली जाते. या योजनेत प्रस्तावित केलेल्या रोजगारांपैकी एक तृतीयांश रोजगार महिलांसाठी राखीव ठेवण्याची तरतूद होती. मनमोहन यांच्या सरकारची महत्त्वाची उपलब्धी म्हणून २००८ च्या भारत–यूएस नागरी आण्विक कराराकडे पाहता येते. या कराराने ऊर्जा सुरक्षा आणि राजनैतिक संबंधांसाठी भारतीय इतिहासातील एक महत्त्वाचा टप्पा गाठला. “सिव्हिल न्युक्लिअर डील’ या अमेरिकेबरोबर केलेल्या करारामुळे भारताला अनेक दशकांपासून मर्यादित असलेल्या अणुऊर्जेच्या गरजा पूर्ण करण्यासाठी अमेरिकेकडून सहकार्य मिळवण्याचा मार्ग मोकळा झाला. भारत–अमेरिका अणुकरारानंतर, ऑस्ट्रेलिया समूह, वासेनार करार, क्षेपणास्त्र तंत्रज्ञान नियंत्रण व्यवस्था यांसारख्या इतर निर्यात नियंत्रण गटांमध्ये भारताच्या सदस्यत्वाचा मार्ग मोकळा झाला. भारत–अमेरिका अणुकरारानंतर, भारताला धोरणात्मक क्षेत्रातील महत्त्वपूर्ण तंत्रज्ञानात प्रवेश मिळू शकला. अनिच्छुक राजकारणी म्हणून संबोधल्या गेलेल्या

डॉ. मनमोहन सिंग यांच्या पंतप्रधानपदाच्या दहा वर्षांच्या कार्यकाळात याच सर्वात महत्त्वाच्या अणुकरारावरील महत्त्वपूर्ण विश्वासदर्शक ठरावावर समाजवादी पक्षाचा पाठिंबा मिळवला गेला होता. ही लक्षवेधी मुत्सद्देगिरी मानली गेली.

राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायदा–२०१३ हा भारत सरकारने अधिसूचित केलेला कायदा आहे. याद्वारे देशातील सर्वसामान्य जनतेला अन्नधान्य उपलब्ध असावे हे सुनिश्चित करण्याचे भारत सरकारचे उद्दिष्ट आहे. मनमोहन सिंग सरकारची ती एक महत्त्वाची उपलब्धी मानावी लागेल. राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायदा, २०१३ (याला अन्नाचा अधिकार कायदा म्हणूनही ओळखले जाते)चा उद्देश भारतातील १.२ अब्ज लोकांपैकी सुमारे दोन तृतीयांश लोकांना अनुदानित अन्नधान्य प्रदान करणे हा आहे. एप्रिल २०२४ मध्ये त्यांनी प्रकृतीच्या कारणास्तव राज्यसभेतून निवृत्ती घेतली. राज्यसभेतील त्यांच्या शेवटच्या दिवशी कौतुकाचा वर्षाव करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांना “प्रेरणादायी उदाहरण’ म्हटले होते. “मनमोहन सिंग यांनी देशाला दीर्घकाळ उत्तम प्रकारे मार्गदर्शन केले. जेव्हा जेव्हा आपल्या लोकशाहीचा उल्लेख केला जाईल तेव्हा ते त्या मोजक्या सन्माननीय सदस्यांपैकी एक असतील. ज्यांचे योगदान नेहमीच स्मरणात राहील,’ असे मोदी म्हणाले होते.

डॉ. मनमोहन सिंग यांच्या स्मरणार्थ भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे सर्व अधिकृत कार्यक्रम, स्थापना दिन समारंभ पुढील सात दिवसांसाठी रद्द करण्यात आले. यात सर्व आंदोलनात्मक आणि इतर कार्यक्रमांचा समावेश आहे. “माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग हे अशा दुर्मीळ राजकारण्यांपैकी एक होते, ज्यांनी सर्वांना समानतेने हाताळले. भारतीय अर्थव्यवस्था सुधारण्यासाठी त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. केलेल्या देशसेवेसाठी, निष्कलंक राजकीय जीवनासाठी आणि अत्यंत नम्रतेसाठी ते देशवासीयांच्या नेहमीच स्मरणात राहतील’, असे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी म्हटले. याखेरीजही अनेक महनियांनी त्यांच्याबद्दल गौरवोद्गार काढले. राष्ट्रीयच नव्हे तर आंतरराष्ट्रीय पातळीवरही त्यांचे अफाट अर्थकौशल्य गौरवले गेले. माजी अमेरिकन राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा यांनी तर त्यांना गुरू मानले होते. देशाच्या विकासात, अडचणींमध्ये मोलाची भूमिका बजावणारा हा अर्थतज्ज्ञ इतिहासात अमर झाला आहे. त्यांचे विचार, मनोगते आणि आर्थिक विषयावरील सल्ले देश कधीच विसरणार नाही.

**स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)**

# सावत्रीमाई फुले महिला शिक्षणाच्या उध्दारकर्त्या



सावित्रीमाई फुले या पहिल्या महिला शिक्षिका म्हणून ओळखल्या जातात. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य मुलींचे शिक्षण आणि स्त्रियांचे कल्याण साधण्यात व्यथित केले. मुलींना शिक्षण मिळावे म्हणून त्यांनी ज्योतिबा फुले यांच्या साह्याने पुणे शहरात मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली. त्यानंतर त्यांनी समाजामध्ये स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध देखील लढा दिला. त्यांनी केलेले कार्य संपूर्ण स्त्रियांसाठी खूपच मूल्यवान आहे.

आजच्या या पोस्टमध्ये सावित्रीमाई फुले यांच्या वर निबंध लिहून दिलेला आहे. या निबंधातून सावित्रीमाई फुले यांची संपूर्ण माहिती, शिक्षण, पुरस्कार, कार्य या बद्दल सविस्तर माहिती दिलेली आहे. हा निबंध सर्व शालेय विद्यार्थ्यांसाठी खूप उपयुक्त आहे.

सावित्रीमाई फुले यांचा जन्म ३ जानेवारी १८३१ रोजी महाराष्ट्रातील सातारा येथे झाला. सावित्रीमाई फुले यांचे वयाच्या नऊव्यावर्षी जोतिबा फुले यांच्याशी लग्न झाले. महात्मा ज्योतिबा फुले हे एक महान विचारवंत समाजसुधारक, लेखक आणी क्रांतिकारक होते. सावित्रीमााई फुले यांना भारताची पहिली महिला शिक्षिका म्हणून ओळखले जाते.

त्यांना भारतीय स्त्रीविधाची जननी मानले जाते. त्यांचे पती जोतिबाराव फुले यांच्या प्रदेशात त्यांनी भारतातील महिला आधिकार सुधारण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. सावित्रीमाईनी आणि ज्योतिबारावांनी १ जानेवारी १८४८ साली पुण्यातील भिडे वाड्यात मुलींची पहिली शाळा उघडली.

त्यांनी विधवा, केशवपन थांबवण्यासाठी नहाव्याचा संप केला. सवित्रीमाईच्या आईचे नाव लक्ष्मीबाई होते तर वडीलांचे नाव खंडोजी नेवसे पाटील होते. सावित्रीमाईचे सासरे गोविंदराव फुले हे मूळचे फुरसुंगीचे गोरे परंतु पेशव्यांनी त्यांना पुण्यातील फुलबागेची जमीन बक्षीस म्हणून दिली. त्यामुळे त्यानंतर त्यांचे गोरे हे आडनाव संपुष्टात येऊन तेथील लोक त्यांना फुले या नावाने ओळखू लागली.

सावित्रीमाई फुले यांचे टोपण नाव ज्ञानज्योती आणि ज्योती असे होते. सावित्रीमाई फुले या धर्माने हिंदू होत्या. त्यांचा जन्म दिवस हा संपूर्ण भारत देशात बालिका दिन म्हणून साजरा केला जातो. स्वतः सावित्रीमाई मुलींना शिकवण्यासाठी शाळेत जात असत. त्याकाळी मुलींना शिक्षण घेण्यास त्या काळातील लोकांची परवानगी नव्हती. त्यामुळे सावित्रीमाई देखील सुरुवातीला अशिक्षित होत्या. मुलींना शाळेत शिकवण्या अगोदर सावित्रीमाईनी ज्योतिबा फुले यांच्याकडून शिक्षणाचे धडे घेतले.

पण त्याकाळी मुलींना शिकवणे हे इतके सोपे नव्हते. त्यांना लोकांच्या कडक विरोधाचा सामना करावा लागला. सावित्री माई शाळेत जात असताना धर्माचे आणि स्त्री शिक्षणाचे विरोधी लोक कचरा , गाळ, आणि शेण त्यांचावर टाकत. यामुळे सावित्री माईंचे कपडे घान व्हायचे , म्हणुन त्या आणखी एक साडी आपल्या सोबत घ्यायच्या आणि शाळेत आल्यावर ती साडी बदलत असे.इतके असूनही त्यांनी हार मानली नाही. स्त्री बालहत्या रोखण्यासाठी त्यांनी नवजात मुलांसाठी एक आश्रम ही उघडल. त्यानंतर सावित्रीमाई फुले यांनी माघे फिरून पाहिले नाही. त्यांच्या जीवन काळात त्यांनी पुण्यात १८ महिला शाळा उघडल्या. जोतिबा फुले हे स्वतः अध्यक्ष होते आणि सावित्रीमाई फुले या महिला विभागाच्या प्रमुख होत्या.जोतिबा फुले यांनी जन्मभर खालच्या जाती, महिला आणि दलीत यांच्यासाठी काम केले. या कामात सावित्रीमाई फुले आणि त्यांचे पती ज्योतिबा फुले यांनी मोलाची कामगिरी केली.

सावित्रीमाई फुले यांनी स्त्री कल्याणासाठी देखील खूप कार्य केले. त्यांनी स्त्रियांवर होणारे अत्याचार थांबावे यासाठी खूप प्रयत्न केले. त्यांनी आपल्या पती समवेत काशीबाई नावाच्या विधवेचा स्वीकार केला आणि तिला आपुलकी दिली. नंतर त्यांनी यशवंत नावाच्या मुलाला दत्तक घेतले. त्याला चांगले संस्कार व शिक्षण दिले. तो मुलगा नंतर मोठा डॉक्टर झाला. सावित्रीमाई फुले मुळे आज प्रत्येक घरातील मुली शिकत आहेत. सावित्रीमाई शिकल्या म्हणून मुलींना स्वतःचा हाक निर्माण करता आला.

सावित्रीमाई फुले यांनी प्रत्येक महिलांचे जीवन जगणे सोपे केले आहे. आज प्रत्येक जागी स्त्रीला मान दिला जात आहे म्हणून त्या खूप मेहनत करत आहेत. पहिल्या कली स्त्रियांना शिक्षण घेण्याचे, मनसोक्त जगण्याचे अधिकार नव्हते आणि आज प्रत्येक क्षेत्रात स्त्रियाच अव्वल आहेत. त्यांच्यामुळेच आज सर्व क्षेत्रात स्त्रियांना स्वातंत्र्य आहे. सावित्रीमाई शिकल्या नसत्या तर आजही स्त्रिया चूल आणि मूल यातच गुंतून राहिल्या असत्या.

सावित्रीमाई फुले या अगदी नऊ वर्षांच्या असताना त्यांचा विवाह महात्मा ज्योतिबा फुले यांच्याशी लाऊन देण्यात आला. परंतु त्यांना स्त्रियांवरील बंधने मुळीच मान्य नव्हती. त्यामुळे स्त्रियांवरील अत्याचार थांबावे यासाठी स्त्रियांचे कल्याणासाठी काम करायला सुरु केले. त्यांना माहिती होते की जर स्त्रियांना समाजात मान, संमान मिळवून द्यायचा असेल, त्यांच्यावरील अत्याचार थांबवायचे असतील तर त्यांना अगोदर शिक्षित करणे खूप गरजेचे आहे. म्हणून त्यांनी पुण्यातील भिडे गुरुजी यांच्या वाड्यात मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली. सावित्रीमाई फुले या लेखिका आणि कवयत्री सुद्धा होत्या. त्यांनी १८५४ मध्ये काव्यफुले आणि १८९२ मध्ये बावन काशी सुबोध रत्नाकर प्रकाशित केले आणि “जा शिक्षण मिळवा” नावाची कविता प्रकाशित केली. ज्यामध्ये त्यांनी वंचित लोकांना शिक्षण घेऊन स्वतः ला मुक्त करण्यासाठी प्रोत्साहित केले.

त्यांनी महिलांसाठी निवारा स्थान उघडले जिथे ब्राह्मण विधवा त्यांच्या मुलांची साक्षी तकणे प्रसूती करू शकत होत्या. सावित्रीमाई आणि ज्योतिरावांनी सती प्रथेला कडाडून विरोध केला आणि त्यांनी विधवा आणि वंचित मुलांसाठी आश्रमाची स्थापना केली. सावित्रीमाई फुले यांनी स्त्रियांना शिक्षित करण्यासाठी खूप मोलाचे योगदान दिले आहे.

# मातृत्व अनुदान योजना आदिवासी गर्भवती साठी ठरते नवसंजीवनी–डॉ.नितिन वानखेडे

### जिल्ह्यात गेल्या ३ वर्षात ५४१३ मातांनी घेतला लाभ




**गोंदिया:–** गर्भवती महिला आणि माता यांच्या आरोग्यदायी जीवनासाठी देशभरात अनेक योजना राबविल्या जात आहेत. देशातील नवसंजीवनी कार्यक्षेत्रातील आदिवासी ग्रामीण भागात राहणाऱ्या कुटुंबामधील गर्भवती मातांना आर्थिक लाभ देण्यासाठी केंद्र शासनाने मातृत्व अनुदान योजना दि २५ जून १९९५ सुरु केली असल्याची माहीती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.नितीन वानखेडे यांनी दिली आहे.

आदिवासी भागातील माता आणि अर्भक मृत्यू कमी करण्याबरोबरच आदिवासी लोकांची आरोग्याची स्थिती सुधारून त्यांचे जीवनमान वाढवण्याचे उद्देशाने राज्यातील निवड्क नवसंजीवनी आदीवासी गावांसाठी राबविण्यात येत असुन गोंदिया जिल्ह्यातील ३६८ नवसंजीवनी आदिवासी गावासांठी मातृत्व अनुदान योजना गर्भवतींसाठी नव संजीवनी ठरत आहे.या योजनेचा लाभ गेल्या ३ वर्षभरात ५४१३ महिलांनी घेतला आहे.

मातृत्व अनुदान योजना गरोदर मातांची नियमित आरोग्य तपासणी व्हावी व त्यांना सुयोग्य आहार वेळेत उपलब्ध व्हावा तसेच त्यांना गरोदरपणात व नंतर विश्रांती मिळावी त्या दृष्टीने शासनाने मातृत्व अनुदान योजना राबविण्यात येते. या योजनेमधे गरोदरपणामध्ये रुपये ४००/– रोखीने व रुपये ४००/– ची औषधे याप्रमाणे प्रत्येक लाभार्थीला एकूण रुपये ८००/– चा लाभ दिला जातो. या योजनेचा लाभ २ जिवंत अपत्य (२ जिवंत अपत्ये व सध्या गरोदर) असणाऱ्या आदिवासी महिलांना दिला जातो. योजनेचा लाभ मिळविण्यासाठी जवळच्या शासकीय रुग्णालयातील आशा सेविका/आरोग्य सेविका/ अंगणवाडी सेविका यांच्याशी संपर्क साधण्याची माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.नितिन वानखेडे यांनी दिली आहे.

# एसटी महामंडळाच्या पाच हजार बसेस भंगारात



**नागपूर:–** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळात (एसटी) मागील पाच वर्षांमध्ये पाच हजार बसेस भंगारात निघाल्या आहेत. भंगारात निघालेल्या बसेस तुलनेत नवीन बसेस उपलब्ध न झाल्याने प्रवाशांना समस्यांचा सामना करावा लागत आहे. हळू– हळू बसेस कमी होण्यासह एसटीच्या प्रवासी सेवेतील अडचणींबाबत आपण जाणून घेऊ या.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळात (एसटी) २०१८–१९ दरम्यान १६ हजार ४१४ बसेस प्रवासी सेवेत होत्या. ही संख्या २०२२– २३ मध्ये घसरून १३ हजार ३१६ बसेसपर्यंत खाली आली. त्यामुळे बसेसची संख्या कमी होतांना दिसत आहे. तर ३१ मार्च २०२० दरम्यान एसटीच्या १ हजार ५८६ बसेस भंगारात निघाल्या. ३१ मार्च २०२१ मध्ये ९२९ बसेस, ३१ मार्च २०२२ मध्ये ७५२ बसेस, ३१ मार्च २०२३ मध्ये ५७९ बसेस तर ३१ मार्च २०२४ दरम्यान तब्बल १ हजार १२९ बसेस भंगारात निघाल्याची माहिती माहिती सामाजिक कार्यकर्ते अभय कोलारकर यांना माहिती अधिकार कायद्याव्दारे प्राप्त झाली.

दरम्यान जुन्या बसेस भंगारात निघत असताना नवीन बसेस एसटीच्या ताफ्यात फारशा न आल्याने महामंडळातील बसेसची संख्या घसरली आहे. हिवाळी अधिवेशनादरम्यान महामंडळाचे अध्यक्ष भरत गोगावले यांनी संचालक मंडळाची नागपुरात बैठक घेतली. यावेळी त्यांनी महामंडळाच्या ताफ्यात नवीन वर्षात ३ हजार ५०० बसेस दाखल होणार असल्याचा व ईव्ही बसेस व भाडेतत्वावरीलही अनेक बसेस मिळणार असल्याचा दावा केला होता. यावर आता महाराष्ट्र एसटी कर्मचारी काँग्रेसने प्रश्न उपस्थित केला आहे. मागील दोन वर्षांत घोषित नवीन बसेस गेल्या कुठे, असा या संघटनेचा प्रश्न आहे.

# जिल्ह्यात दारू विक्रीचे परवाने किती?



**गोंदिया:** एकेकाळी जिल्ह्यात मोजक्या ठिकाणी जनतेला बार व्यवसाय दहा–पंधरा वर्षात शहरात सर्वत्र विस्तारला गेला. यातून दारु रिचविण्याचे प्रमाणही वाढले. जिल्हा व्यापाराच्या दृष्टीने सतत वाढत आहे. दरम्यान, राज्य उत्पादन शुल्क विभागाने गेल्या २ वर्षात अवैध दारु विक्री, विना–परवाना हॉटेल, ढाब्यावर ग्राहकांना दारु उपलब्ध करुन देणाऱ्यांवर कारवाई केली. साहित्य जप्तीसह दंडात्मक कारवायांमुळे अनेक ढाबे, हॉटेल चालक, मालक बार परवाना घेण्याकडे वळले. परिणामी, जिल्ह्यात दोन वर्षात बारची संख्या वाढली आहे. जिल्ह्यात पोलीस विभागाकडून अवैध दारु विक्रेत्यांवर कारवाई होत असली तरी अवैध दारु विक्री जोरात सुरु आहे.

**जिल्ह्यात दारु विक्रीची दुकाने**

गोंदिया जिल्ह्यामध्ये सरकारमान्य ८१ देशी दारु दुकाने आहेत. गोंदिया जिल्ह्यात १७६ बार सुरु असून, दोन वर्षातील कारवायांमुळे यात वाढ झाली. तर ७ बियर शॉपी आहेत.

जिल्ह्यात २० वाइन शॉप आहेत. यात देशी, बियर,वाइन व विदेशी मद्याची विक्री होते. किचकट प्रक्रिया, खर्च अधिक असल्याने वाइन शॉप परवान्यांमध्ये फार वाढ झाली आहे.

# प्रसारमाध्यमे:ब्राम्हणी व्यवस्थेचे बटिक




बोलणाऱ्यांची मातीही खपते, परंतु न बोलणाऱ्यांचे मोतीही खपत नाही. ही अतिशय गहन अर्थपूर्ण म्हण बरंच काही सांगून जाते. बोलून अर्थात, प्रचार प्रसार करून कुठलीही गोष्ट लोकांच्या मनावर ठसविता येते आणि लोकांना फसवता येते. याबाबतीत देशविदेशातील अनेक ऐतिहासिक गोष्टी आपल्या नजरेस येऊ शकतात. अलिकडच्या ईलेक्ट्रॉनिक मीडियावर येणाऱ्या अनेक उत्पादनांच्या जाहिराती आणि त्या ऐवजांची सुमार गुणवत्ता यावरून सामान्य माणसाला देखील फसवणूक लक्षात येऊ लागली आहे. आणि भांडवली मीडियाचे पैशापासरी चरित्र उमजून येत आहे.

प्रसारमाध्यमे जनमानस घडवणारे अतिशय महत्त्वाचे आणि कमालीचे प्रभावी साधन असल्यामुळे आधुनिक समाजाच्या जडणघडणीत प्रसारमाध्यमांची भूमिका फार महत्त्वपूर्ण समजली जाते. आधुनिक इतिहासातील एक महत्वाचे साधन म्हणजे पत्रकारिता होय. लोकशाहीचे चार स्तंभ.चौथा स्तंभ म्हणजे पत्रकारिता. पण एवढे महत्त्वाचे साधन असलेल्या मीडियाचे चरित्र आज वादाच्या भोवऱ्यात सापडले आहे. उत्पादनांच्या जाहिरातीपासून तर राजकारण, निवडणुका, धर्मप्रसार आणि सांस्कृतिक घडामोडी पर्यंत उच्च जातवर्चस्ववादी मीडिया तटस्थपणे वागू शकत नाहीच उलट वर्णजातवर्गीय व्यवस्थेचा प्रमुख आधारस्तंभ बनला आहे. असा ठपका मीडियावर बसलेला आहे.

या देशात हजारो वर्षे मूठभर उच्च जात समूहाचे वर्चस्व जनमानस घडवणाऱ्या साधनांवर कायम टिकून राहिलेले आहे. स्त्रीशूद्रातिशूद्र अज्ञानात चाचपडत ठेवले गेले. ब्राम्हणी धर्मग्रंथाच्या आडपडद्यात विद्येची दारे बंद करून ठेवली आणि चातुर्वर्ण्य रचनेत शीर्षस्थानी बसलेल्यांनी मतलबी धर्म स्त्रीशूद्रातिशूद्र जनांच्या बोकांडी बसवून अमानुष विचारांचा हजारो वर्षे प्रचार प्रसार केला. चातुर्वर्ण्य म्हणजे धर्म आणि त्या उतरंडीतच जातीबंधनं पालन करणे हाच धर्म. त्यांनीच रचलेले पाखंडी धर्मग्रंथ, ग्रंथातील चमत्कार,पावित्र्य, भूदेवांचे श्रेष्ठत्व, जातिव्यवस्था पक्के करणारी धर्मसूत्रे अहोरात्र सांगत राहिले. भेदाभेद–विषमतेचे विष पेरणारी ही वैदिक वाययीन कृती अपौरुषेय आहे आणि म्हणून वेदांची चिकित्सा केली जाऊ शकत नाही. वर्षोंवर्ष हे एरंडाचे गुऱ्हाळ सिंधुजनांच्या पुढ्यात वाढून हा जनसमुदाय मूढमती ठेवण्याची शक्कल योजत आले. याचे प्रचारक कोण? हा पण पारंपरिक पाखंडी मीडियाच ना! धर्मप्रचार, वर्ण जातबंधनं घट्ट करणारा मीडिया कोणाच्या ताब्यात? शिक्षणबंदी लादलेले स्त्रीशुद्रातिशुद्र या प्रसारप्रचार यंत्रणेत चुकूनही कुठेही दिसणार नाही ही तजवीज कटाक्षाने केलेली.

देव कोण आणि राक्षस कोण? भले कोण आणि वाईट कोण? धर्मसूत्रांनी ठरवलेला हे सांगण्याचा आणि ते समाजावर बिंबवण्याचा त्यांचाच कार्यभाग. वैदिकांशी लढणारे राक्षस, दानव, दैत्य, अक्राळविक्राळ, कुरुप हिडीस, खलनायक. अवैदिक परंपरेतील लोकप्रिय नायक महामानव उत्तुंग व्यक्तिमत्त्व लेखणीच्या बळावर अगदी चारित्र्यहनन करुन खलनायक म्हणून उभे करुन संभ्रम निर्माण करणे किंवा त्यांचेही वैदिकिकरण ब्राम्हणीकरण करुन त्यांची अवैदिक परंपरेपासून नाळ तोडून टाकणे. असे अनेकानेक नारदी मीडियाचे कारनामे सिंधुजनांच्या जिव्हारी लागणारे आहेत.

प्राचीन काळापासून चालत आलेली उच्च जातीय वर्चस्ववादी मीडियाची ही सद्दी संपत तर नाहीच, आधुनिक प्रसारमाध्यमेदेखील अगदी सावध पणाने त्यांच्या ताब्यात ठेवून त्यांना हवा तसा ते वापर करु शकतात. ओबीसीचा मंडल लढ्याचा देशभर भडका उडालेला असताना तो दाबून टाकण्यासाठी मंडल विरोधी वातावरण याच ब्राम्हणी मिडियाने तापवून ओबीसी समाजाला भ्रमित करण्यात आले. तत्कालीन प्रधानमंत्री व्ही. पी. सिंग यांनी मंडलची घोषणा केल्याबरोबर त्यांच्यावर आगपाखड करण्यात हा ब्राम्हणी मीडिया अहोरात्र झटत होता. सरकारला बदनाम करून त्यानंतरच्या आरक्षणविरोधी घटनांचा केवढा मोठा गवगवा प्रसारमाध्यमांनी केला. ओबीसींकरीता आरक्षण लागू केल्याने जणू देशावर संकटच आले अशाप्रकारे चित्र उभे केले गेले.

तर मंडल अर्थात ओबीसी आरक्षणावरुन अवधान विचलित करण्यासाठी निघालेल्या रामरथयात्रेला भरभरून प्रसिद्धी देण्यात आली. आणि ओबीसी लढा निर्णायक भूमिकेत येऊ नये यासाठी बाबरी विध्वंस, बॉंबस्फोटाची मालिका, धार्मिक जातीय दंगे ओबीसींच्या आरक्षणाच्या प्रश्नापेक्षा अवाढव्य मोठे करुन दाखवण्याची किमया दलाल मीडियाने साधली.

घराघरात दूरदर्शन संच स्थिर होऊ लागताच रामायण, महाभारत आणि यांसारख्या अन्य धार्मिक मालिकाही प्रसारित करण्यात कुचराई केली नाहीच. विज्ञानाच्या आविष्कारातून तयार झालेले टेलिव्हिजन धर्म, कर्मकांड, कुंडली, चमत्कारिक गोष्टीचे प्रचारक बनले. आणि धार्मिक उन्माद वाढीस घालणाऱ्या नव्या अध्यायाला मूर्त स्वरूप प्राप्त झाले. क्रिकेटच्या सामन्यांचे प्रसारणासाठी खास वेळ राखून ठेवण्यात आलेली असत. निवडणुका आल्या की जसं हिंदुत्व धोक्यात येते, रातोरात धर्म खतरेमें येण्याची कंडी पिकू लागते, अचानक पुलवामा प्रकरण उद्भवते, दारिद्र्यात पिचत पडलेल्या बहिणी लाडक्या होऊ लागतात. शेतात सालभर खपाट पोटाने खपून शेतकरी पिक काढतो, बाजारात मातीमोल दराने सोयाबीन कापूस धान आदी शेतमाल विकावा लागतो, तो शेतकरीही ऐनवेळी ‘किसान सम्मान निधी योजने’त फिफट्ट बसतो आणि दारुच्या व्यसनामुळे शेतकरी आत्महत्या घडतात असा जावईशोध पत्रकारितेला लागलेला असतो. हिंदुत्व धोक्यात आलेले असल्यामुळे स्त्रियांवरील बलात्काराच्या घटना, तरुणांवरील बेरोजगारीची टांगती तलवार, ओबीसी मराठा मागासवर्गीय आरक्षणाचे प्रश्न कस्पटासमान होऊन जातात.

आणि अशाच पारंपारिक मानस घडवण्याचा विडा उचललेला मीडिया आरक्षणविरोधीतत्व रोमारोमात भरलेल्यांशी खुलेआम उठबस करणारा ‘बुवा’ ‘भाऊ’ बनून ओबीसीचं भलं करणारा आहे असा दवंडी पिटत असतो, तर अच्छे दिन आणणारा नॉनबायलॉजिकल ‘अवतारी पुरुष’ चमत्कारिक वाटून जणू त्याची लाट तयार झाल्याची बित्तंबातमी कव्हर करण्याचे जिगरबाज काम गोदी मीडिया करत असतात.

अर्थात, मीडिया म्हणजे निर्जीव अशी तंत्रसाधने नव्हेत, तर जितीजागती जातवर्गीय हितसंबंध पुष्ट करणारी मोजक्या माणसांची ही जमात. जनमानस पोखरून टाकणारी टोळधाड! केवढी मोठी बलवत्तर ही मीडियाची सत्ता. पण या मीडियावर कुणाची मांड आहे? वृत्तपत्र संपादक इलेक्ट्रॉनिक मीडिया आदी ठिकाणी किती ओबीसी दलित आदिवासी आहेत? हा प्रश्न या देशाच्या केंद्रीय सत्तेतील विरोधी पक्षनेते सार्वजनिक ठिकाणी उपस्थित करतात आणि जातीजनगणना करण्यासाठी आग्रही असतात. आणि ओबीसी दलित आदिवासी मागास यांच्यापैकी मीडियावर नसतील मर मिडीयामध्ये चलती असलेले यांची बाजू मांडणार कशी? कोण? यांना न्याय कसा मिळेल?

अपवाद वगळता सामाजिक न्यायाच्या बाजूने उभे राहत नाही म्हणून प्रस्थापित मीडियावर क्रुद्ध असलेला जनसमुदाय मीडियावर विश्वास ठेवू इच्छित नाही. बाजारु मीडिया, पाखंडी मीडिया, नारदी मीडिया, दलाल मीडिया, भांडवली मीडिया, गोदीमीडिया, पीतपत्रकारिता म्हणून बोळवण करत असतात. मूठभर बड्या हस्तींचे, उच्चजातीय हितसंबंधाचे लांगुलचालन करुन कष्टकरी समाजाला मातीत घालणारा मीडिया म्हणून मीडियाचा पानउतारा होत असते. भाटगिरी करणे, सत्ताधीन असणे, चाटुगिरी करणे, चापलूसी करणे ही अंगभूत वैशिष्ट्ये असलेल्या या मीडिया चे चालक मालक वाहक उच्च जातवर्गीय. गोबेल्स तंत्रावर आधारित एकच झूठ तपशील वारंवार सांगितले की तेच खरं वाटायला लागते. हेच तंत्र जाहिरातीत वापरून ग्राहकांना मतीगुंग बनवले जाते. धर्म, अर्थ, राजकारण, सत्ता याबाबतच्या मतलबी प्रचारामुळे सामान्य भलामाणूस यात भरडला जातो नाडला जातो नागवला जातो. भलेभले सूज्ञ उच्चशिक्षितही समाजी यात फसतात समाजव्यवस्था समजून न घेतल्याने, अशा खतरनाक मीडियाचा बीमोड कसा करायचा हा सवाल डीजीटल समाजाला अधिकच अंतर्मुख करणारा ठरावा. तरच भलामाणूस ताठपणे उभा होईल!

**अनुज हुलके**

# रानडुकराची शिकार करून मास विक्री करणारे तिघे ताब्यात



**गोंदिया :–** अर्जुनी–मोरगाव तालुक्यातील अर्जुनी वनपरिक्षेत्रात रानडुकराची शिकार करून मास विक्री करणाऱ्या पाच पैकी तीन आरोपींना वन विभागाच्या पथकाने रविवार २९ डिसेंबर रोजी रंगेहाथ पकडले. दरम्यान दोन आरोपी फरार झाले असून अटक करण्यात आलेल्या तिन्ही आरोपींना १२ जानेवारीपर्यंत न्यायालयीन कोठडी ठोठावण्यात आली आहे. या प्रकरणी वन विभागाच्या पथकाने आरोपींकडून १ भरमार बंदुक, १० बारूद गोळा, दोन कासवाचे कवच असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

रानडुकराची शिकार करून मास विक्री होत असल्याची गुप्त माहिती वनपरिक्षेत्र कार्यालय अर्जुनी मोरगावला मिळाली. या माहितीच्या आधारे चौकशी केली असता आरोपी सोनूसिंग शैलेंद्रसिंग टाक ( रा. सिंगलटोली, अर्जुनी मोरगाव) यांच्या घरी घटनेतील आरोपी शिकार केलेल्या रानडुक्कराचे ५० किलो मांस विक्री करताना दिसून आले. दरम्यान, घटनेची अधिक चौकशी केली असता आशिक उर्फ लक्ष्मण राजकुमार मेश्राम (रा. येरंडी देवी) यांच्या घरून एक भरमार बंदूक, १० बारुद गोळे, कासवाचे दोन कवच व इतर हत्यार जप्त करण्यात आले आहेत.

यातील सोनूसिंग शैलेंद्रसिंग टाक व बिरुसिंग निर्मलसिंग टांक दोघेही रा. सिंगलटोली, अर्जुनी मोरगाव, हे फरार असून मांस घेणारे ग्राहक आरोपी होमेंद्र जिजराम राकडे व नरेश रामजी खोब्रागडे दोघेही रा. पिंपळगाव /खांबी तर शिकारीचे साहित्य मिळालेल्या आशिक उर्फ लक्ष्मण राजकुमार मेश्राम रा. येरंडी/देवी या पाचही आरोपींवर वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ अंतर्गत कलम २ (१६), ९, ३९, ४४, ४८,५१ कलमान्वये वन गुन्हा जारी करण्यात आला आहे. घटनेचा तपास उपवनसंरक्षक प्रमोद पंचभाई, प्रकाष्ट निष्कासन अधिकारी अविनाश मेश्राम यांच्या मार्गदर्शनात वनपरिक्षेत्राधिकारी राजेंद्रसिंह बहुरे अर्जुनी मोरगाव करीत आहेत. दरम्यान तीन आरोपींना १२ जानेवारीपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली असून त्यांची भंडारा कारागृहात रवानगी करण्यात आली आहे. तर ईतर दोन फरार आरोपींचा शोध वन विभागाकडून करण्यातयेत आहे.

# सरकारने शब्द फिरवला..२५ ऐवजी २० हजारच बोनस मिळणार

**गोंदिया:–**जिल्ह्यातील प्रमुख पीक धान आहे. खरीप उन्हाळी हंगामात जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात धानाचे उत्पादन घेतले जाते. उत्पादन खर्चाच्या तुलनेत धानाला हमीदर कमी असल्याने गत काही वर्षापासून धान उत्पादकांना शासन सानुग्रह अनुदान (बोनस) देते. महायुतीने विधानसभा निवडणुकीच्या वचननाम्यात धान उत्पादकांना हेक्टरी २५ हजार रुपये बोनस देण्याचे जाहीर केले होते. जिल्ह्यासह राज्यात महायुतील प्रचंड यश मिळत सत्ता स्थापन झाली. नागपूरात राज्य विधीमंडळाचे हिवाळी अधिवेशनाचे शनिवारी सूप वाजले. दरम्यान सत्ताधाऱ्यांनी शब्द फिरवित २५ ऐवजी २० हजार रुपये बोनस जाहीर केला. धान उत्पादकांचा भ्रमनिराश झाल्याची चर्चा असून शेतकऱ्यांनी सरकारवर नाराजी व्यक्त केली आहे.

गोंदिया जिल्ह्यात खरीप हंगामात १.९० लाख व उन्हाळी हंगामात ७० हजार हेक्टर क्षेत्रात धानाची लागवड होते. उत्पादन खर्चाच्या तुलनेत धानाला हमीदर कमी असल्याने शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी धानाला बोनस देण्याची परंपरा आहे. दर वर्षी शेतकरी, शेतकरी संघटना, लोकप्रतिनिधींकडून बोनसची मागणी होते. पूर्व विदर्भातील गोंदिया, भंडारा, गडचिरोली, चंद्रपूर, नागपूर जिल्ह्यातील काही भागांत व कोकणात धानाचे उत्पादन होते. गत काही वर्षापासून नैसर्गिक संकटामुळे धान उत्पादकांवर आर्थिक संकट निर्माण झाले आहे. उत्पादन खर्चाच्या तुलनेत अल्प हमीभाव असल्याने धान उत्पादक



राज्यांमध्ये तेथील सरकार सानुग्रह अनुदान अर्थात बोनस देतात. महाराष्ट्रातही बोनस दिला जातो. धानाला बोनस जाहीर करावा, अशी मागणी शेतकरी, राजकीय पक्ष, विविध संघटनांकडून झाली. वरील जिल्ह्यांत धान उत्पादकांची संख्या मोठी आहे. येथील शेतकऱ्यांचे अर्थकारण धानावरच अवलंबून आहे. नैसर्गिक आपत्ती ओढवल्यास त्यांना मोठ्या नुकसानीला सामोरे जावे लागते. यंदा पावसाने थैमान घातले, धानाचे नुकसान झाले, उरली कसर किडींच्या प्रादुर्भाने भरून काढली. उत्पादन कमी झाले. विधान सभा निवडणुकीत महायुतीने

धान उत्पादकांना दोन हेक्टरच्या मर्यादेत ५० हजार रुपये बोनस देण्याचे वचननाम्यात जाहीर केले होते. महायुतीने सत्ता स्थापन केली. नागपूरात राज्य विधीमंडळाचे हिवाळी अधिवेशन १६ ते २१ डिसेंबर दरम्यान झाले. अधिवेशनात सत्ताधारी वचननाम्यानुसार हेक्टरी २५ हजार रुपये बोनस जाहीर करतील अशी अपेक्षा धान उत्पादकांना होती. तशी मागणी देखील धान उत्पादक जिल्ह्यातील आमदारांनी सभागृहात मांडली. दरम्यान अधिवेशनाच्या शेवटच्या दिवसी मुख्यमंत्र्यांनी भरीव तरतुद नसल्याने गत हंगामाप्रमाणेच हेक्टरी २० हजार प्रमाणे दोन हेक्टरच्या मर्यादेत धानाला बानेस जाहिर केला. यांचा जिल्ह्यातील पावनेदोन लाख शेतकऱ्याना लाभ मिळेल. असे असले तरी वनचन नाम्यानुसार हेक्टरी २५ हजार रुपये बोनस देणे अपेक्षित होते. सरकारने शब्द फिरविल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजीचा सूर आहे.

# स्वतंत्र अहेरी जिल्ह्याची निर्मिती करा



**अहेरी :–** गडचिरोली जिल्ह्याचे विभाजन करून अहेरी जिल्हा बनविण्याची मागणी मागील १५ ते २० वर्षांपासून केली जात आहे. पण या मागणीकडे दुर्लक्ष होत आहे. जिल्ह्याच्या दक्षिण भागाच्या विकासावर लक्ष केंद्रीत करण्यासाठी जिल्ह्याची दोन भागात विभागणी करून अहेरीला स्वतंत्र जिल्ह्याचा दर्जा द्यावा, अशी मागणी राष्ट्रीय मानवाधिकार संघटनेने केली आहे.

संघटनेचे प्रदेश अध्यक्ष प्रणय खुणे, विदर्भ अध्यक्ष जावेद अली, जिल्हा अध्यक्ष रमेश अधिकारी, तालुका अध्यक्ष फारुक शेख, जिल्हा सचिव रतन दुर्गे यांच्यासह महेश अलोने, सचिव सुरेश दुर्गे, रोशन सय्यद, मिलिंद अलोने, अमोल अलोने, दीपक गुरनुले, नागेश तोरेम, अनिल पारधी, रामदास ओंडरे आदींनी यासंदर्भातील निवेदन दिले.

सिरोंचा ते गडचिरोली हे २२० किमी अंतर असल्याने नागरिकांना मुख्यालयी येणे–जाणे करण्याकरीता मोठा भुर्दंड सोसावा लागतो. अतिशय वाईट रस्ते असल्यामुळे सिरोंचा येथील नागरिकांना परराज्यातून फेरा घेऊन जावे लागते. हा त्रास कमी करण्यासोबत अहेरी भागाच्या विकासावर लक्ष केंद्रीत करण्यासाठी स्वतंत्र जिल्हा होणे गरजेचे असल्याचे प्रणय खुणे यांनी सांगितले.अहेरी, एटापल्ली, भामरागड, सिरोंचा तालुक्यातील नागरिकांच्या या मागणीला आता राष्ट्रीय मानवाधिकार संघटनेने बळ दिले आहे.

# कौशल्यपूर्ण व दर्जेदार शिक्षणासोबतच योग्य मार्गदर्शन जरुरी-माजी आमदार राजेंद्र जैन

**गोंदिया:–** गोंदिया शिक्षण संस्था द्वारा संचालित जी.ई.एस हाईस्कूल व कनिष्ठ कला व विज्ञान महाविद्यालय, रावनवाड़ी येथे तिन दिवसीय वार्षिक स्नेह सम्मेलनाचे उद्घाटन संस्थेचे सचिव व माजी आमदार राजेंद्र जैन यांच्या हस्ते संपन्न झाला. तीन दिवसीय वार्षिक स्नेह सम्मेलनात सांस्कृतिक कार्यक्रम, बौद्धिक स्पर्धा, गीतगायन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. याप्रसंगी शासकीय सेवांमध्ये विविध पदावर सेवा देणाऱ्या महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांचा सत्कार राजेंद्र जैन यांच्या हस्ते करण्यात आला व त्यांनी सर्वांचे अभिनंदन केले.




शाळा व महाविद्यालयाची प्रगती व उन्नती करण्याचे ध्येय असले पाहिजेत. कौशल्यपूर्ण व दर्जेदार शिक्षण देण्यात आपली सर्वोच्च तत्परता व प्रथम प्राथमिकता असेल तर आज स्पर्धेच्या युगात आजचा विद्यार्थी हा उद्याचा भविष्य निर्माता होवू शकतो. विद्यार्थ्यांच्या अंगी आलेल्या सुप्त गुणांना व त्यांच्या कलेला प्रदर्शित करण्याचे काम शिक्षकांसह आपण सर्वांचे आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सुविधा व स्पर्धेच्या युगात स्वतःला सिद्ध करण्यासाठी योग्य मार्गदर्शन व विविध साधनांची सुविधा व योग्य संस्कार देण्याचे काम पालकवर्ग व शिक्षकांनी करावे असे प्रतिपादन संस्था सचिव व माजी आमदार राजेंद्र जैन यांनी केले.

स्नेह संम्मेलनाला सर्वश्री राजेंद्र जैन, वैशालीताई पंधरे, शीलाताई वासनिक, विनोद पटले, गेंदलाल शरणागत, सुरजलाल हरिणखेडे, गेंदलाल बिसेन, आनंद लांजेवार, अनिल गजभिये, रेखाताई लिल्हारे, कल्पना बिसेन, पन्नालाल हरिणखेडे, शीलाताई हरीणखेडे, रेणुकाताई मानेकर, प्रतिमाताई बिसेन, वाघारेताई, सुनील पटले, रौनक ठाकुर, रजनीताई प्रजापती, पद्माताई कुंजाम, माधुरीताई पटले, विकास गेडाम, तिलक भगत, सी.बी.बिसेन, चित्रिव सर, बी ए राऊत, रेखलाल तुरकर, छायाताई पटले, सरिताताई कटरे, आशिष बरईकर, ज्योतीताई हरीणखेडे, रणजीत वासनिक सहित पालक वर्ग, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी विद्यार्थिनी मोठया संख्येने उपस्थित होते.

# पेनगुंडा पोलीस मदत केंद्राच्या हद्दीतील नक्षलवाद्यांचे स्मारक केले उद्ध्वस्त

**गडचिरोली :–** भामरागड उपविभागाअंतर्गत नव्याने उभारण्यात आलेल्या पेनगुंडा पोलीस मदत केंद्राच्या हद्दीत पेनगुंडा ते नेलगुंडा मार्गावर गावापासून सुमारे २ किलोमीटर अंतरावर नक्षलवाद्यांनी मृत नक्षलवाद्यांच्या स्मरणार्थ उभारलेले स्मारक पोलिसांनी शनिवारी (दि.२८) तोडून टाकले. पेनगुंडा मदत केंद्राच्या उभारणीआधीच त्या ठिकाणी सदर स्मारकाची उभारणी केली होती. याबाबत माहिती मिळाल्यानंतर वरिष्ठांच्या मार्गदर्शनात ते उद्ध्वस्त करण्यात आले.

अतिसंवेदनशील आणि अतिदुर्गम भाग असलेल्या भामरागड तालुक्यात बरेच आदिवासी बांधव आज देखील विकासापासून दूर आहेत. त्यांना विकासाच्या प्रवाहात आणून माओवाद्यांच्या कारवायांना आळा बसावा यासाठी गडचिरोली पोलीस दलाच्या वतीने दिनांक ११ डिसेंबर २०२४ रोजी पेनगुंडा या ठिकाणी नवीन पोलीस मदत केंद्राची स्थापना करण्यात आली.

दरम्यान नक्षल स्मारकाबाबत गोपनिय माहिती मिळाल्यानंतर वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली गडचिरोली पोलीस दलाच्या बॉम्ब शोधक व नाशक पथकासह (बिडीडीएस) विशेष अभियान पथकाच्या जवानांनी शोध अभियान सुरु केले. पेनगुंडा ते नेलगुंडा रोडवर माओवाद्यांनी बांधलेले स्मारक दिसून आले. बिडीडीएस पथकाने सदर परिसराची कसुन तपासणी केली. त्यानंतर विशेष अभियान पथकातील जवानांनी ते स्मारक उद्ध्वस्त केले.



ही कारवाई पोलीस अधीक्षक नीलोत्पल, अपर पोलीस अधीक्षक (अभियान) यतिश देशमुख, अपर पोलीस अधीक्षक (प्रशासन) एम.रमेश व अपर पोलीस अधीक्षक (अहेरी) श्रेणिक लोढा, तसेच पोलीस उपअधीक्षक (अभियान) विशाल नागरगोजे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी (भामरागड) अमर मोहिते यांच्या मार्गदर्शनाखाली पार पाडली. माओवाद्यांच्या अशा स्मारकाला समाजात कुठेच स्थान नाही. त्यामुळे कोणीही असे बेकायदेशीर कृत्य करू नये असे आवाहन पोलीस अधीक्षक नीलोत्पल यांनी केले.

## शासकीय ग्रंथालयात १ ते १५ जानेवारी दरम्यान ग्रंथप्रदर्शन

**गोंदिया :–** उच्च व तंत्र शिक्षण विभागाने २० डिसेंबर २०२४ रोजी शासन निर्णय निर्गमीत करुन या विभागाच्या अधिपत्याखालील राज्यातील विद्यापीठे, महाविद्यालये, सार्वजनिक ग्रंथालयांमध्ये 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' हा उपक्रम १ ते १५ जानेवारी या कालावधीत राबविण्याचे जाहीर केले आहे. या उपक्रमांतर्गत सामुहिक वाचन, वाचन कौशल्य, कार्यशाळा, वाचन संवाद, पुस्तक परिक्षण व कथन स्पर्धा, तसेच ग्रंथप्रदर्शनाचे आयोजन करुन अधिकाधिक विद्यार्थ्यांचा सहभाग व सभासद नोंदणी करण्यात येणार आहे.

# शेतकऱ्यांच्या धानाच्या चुकाऱ्यांचे पैसे अदा करा

## राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची मागणी, तहसीदारांना दिले मागण्यांचे निवेदन

**सडक अर्जुनी:–** लगतच्या भंडारा जिल्ह्यातील साकोली येथील आगारात २५ बसेस वाढविण्यात याव्या, तसेच शासकीय धान खरेदी केंद्रावर विकण्यात आलेल्या धानाचे चुकारे शेतकऱ्यांना देण्यात यावे, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाने केली आहे. यासाठी नायब तहसीलदारांमार्फत शासनाला निवेदन पाठविण्यात आले आहे. याशिवाय आमदार राजकुमार बडोले यांनाही मागण्यांचे निवेदन पाठविण्यात आले.



राज्य मार्ग परिवहन महामंडळाकडून महिलांना प्रवास तिकिटात ५० टक्के व ७५ वर्षावरील नागरिकांना मोफत प्रवासाची सवलत देण्यात आली आहे. तेव्हापासून नागरिक मोठ्या प्रमाणात बसने प्रवास करीत आहेत. त्यामुळे बसमध्ये गर्दीचे प्रमाण वाढले आहे. या बाबींचा विचार करुन दुर्गम, नक्षलग्रस्त व जंगलव्याप्त परिसर लक्षात घेता जनतेच्या प्रवासाच्या सोयीसाठी नवीन येणाऱ्या बसेसमध्ये साकोली आगाराल २५ बसेस उपलब्ध करुन देण्यात याव्या.

तसेच खरीप हंगाम सन २०२४–२५ मध्ये आजपर्यंत शासकीय आधारभूत खरेदी केंद्रावर शेतकऱ्यांची धान खरेदी करण्यात आली. त्यांचे चुकारे अजूनपर्यंत शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्यात आले नाहीत. त्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. तरी धानाचे चुकाचे त्वरित शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्यात यावे, अशी मागणीही निवेदनात नमूद करण्यात येत आहे.

निवेदन देताना पक्षाचे तालुकाध्यक्ष डॉ. अविनाश काशिवार, महिला तालुकाध्यक्ष रजनी गिरेपुंजे, नगराध्यक्ष तेजराम मडावी, उपाध्यक्ष वंदना डोंगरवार, सभापती दीक्षा भगत, माजी जि.प. सदस्य रमेश चुऱ्हे, अनिल बिलिया, रुपविलास कुरसुंगे, देवराजी बनकर, शिवाजी गहाणे, दिनेश कोरे, उमेश कापगते, पुष्पमाला बडोले, प्रमिला बडवाईक, अशोक लांजेवार, भोजराज डोंगरवार, पुष्पा गुप्ता, अफरोज शेख, मीनाक्षी काशिवार, भोलाराम कापगते, आस्तिक परशुरामकर, प्रमिला बडवाईक, विनोद कावळे, गोविंदा नागपुरे, हर्षल गिरीपुंज, मनोहर गव्हाणे, फारूक शेख आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

# स्वच्छ भारत अभियानांतर्गत निकृष्ट दर्जाच्या सायकल व पेट्यांचे वितरण

**गोंदिया:–** स्वच्छ भारत अभियानंअंतर्गत राज्यस्तरावरुन ओला व सुखा कचरा जमा करण्याकरीता ग्रामपंचायतींना वितरीत करण्यात आलेल्या तिनसायकिलसह पेट्या निकृष्ट दर्जाच्या असल्याने त्या परत घ्यावे अशी मागणी माजी जि.प.सदस्य व खोडशिवनीचे सरपंच गंगाधर परशुरामकर यानी केले आहे.

स्वच्छ भारत व पाणी पुरवठा मंत्रालयाने राज्य स्तरावरुन गोंदिया जिल्ह्यातील ३०० ग्रामपंचायतींना तिनचाकीसायकली गावातील ओला व सुका कचरा जमा करुन वाहतूक करण्याकरीता देण्यात आल्या आहेत.त्या योजनेंतर्गत सडक अर्जुनी तालुक्यातील खोडशिवनी ग्रामपंचायतीला २९ डिसेंबरला देण्यात आली.रविवार सुट्टीचा दिवस असल्यने सदर सायकल ग्रामपंचायत कर्मचाऱ्याने उतरवून ठेवून घेतली. सोमवार ३० डिसेंबरला सकाळी जेव्हा ग्रामपंचायत कार्यालयात त्या सायकलची पाहणी केली असता अत्यंत निकृष्ठ दर्जाची असून कचरा वाहतूकीकरीता ज्या पेट्या सायकलला लावण्यात आल्याचे बघून आश्चर्य वाटले. त्यामुळे संबधित विभागाने




तिनचाकी सायकल वितरण करणाऱ्या कंत्राटदारासोबत चर्चा करुन वितरीत केलेल्या पेट्या व सायकल परत मागवाव्यात अशी मागणी माजी जि.प.सदस्य गंगाधर परशुरामकर यांनी केली आहे.

# महापुरुषांचे विचार रुजवीण्यासाठी पायाभूत प्रयत्नांची गरज-वंदनाताई वणकर

## गोंदियात संत जगनाडे महाराजांची जन्मशताब्दी उत्साहात, रॅली आणि कीर्तनामुळे वातावरण संतमय

**गोंदिया:–** छत्रपती शाहू महाराज आणि महात्मा फुले नसते तर आम्हाला छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर कळाले नसते. तेव्हा महापुरुषांचे विचार रुजविण्यासाठी पायाभूत प्रयत्नांची समाजाला गरज आहे असे प्रतिपादन विदर्भ तेली महासंघाच्या उपाध्यक्ष वंदनाताई वनकर यांनी (ता. २८) केले. येथील मालवीय नगर परिषद शाळेच्या भव्य प्रांगणात आयोजित संत जगनाडे महाराजांच्या ४०० व्या जन्मशताब्दी कार्यक्रमात त्या प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होत्या.




कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बहुजन समाज पक्षाचे गोंदिया जिल्हा अध्यक्ष सुनील भरणे हे होते. मंचावर तेली समाज भाईचारा कमेटीचे कार्यकर्ते बळीराम डोरले, चंपालाल साठवणे, आदिवासी समाजाचे नेते पवन टेकाम, सामाजिक कार्यकर्त्या सविताताई बेदरकर आणि माजी नगराध्यक्ष आशाताई पाटील उपस्थित होते. याप्रसंगी पुढे बोलताना श्रीमती वनकर म्हणाल्या की, येथील प्रस्थापित समाजव्यवस्थेने आमच्या महापुरुषांचे दैविकरण केलं.कार्यक्रमात गर्दी कमी असली तरी प्रत्येक कार्यकर्ता हा दर्दी असतो.आपली मुलं हे शाळेचे विद्यार्थी आहेत त्यांना वैचारिक प्रबोधन ऐकविण्यासाठी अश्या कार्यक्रमात शामिल करून संस्कारीत करा. त्या पुढे म्हणाल्या की, कुणावर टिकाटिपणी करण्यापेक्षा कार्यकुशल कार्यक्रम आयोजित करणे आवस्यक आहे.

प्रसंगी तिळगुळ कार्यक्रम तसेच साहित्यिक, सामाजिक आणि उद्योजक कार्यक्रम आयोजित करून हे साध्य करता येईल असे त्या म्हणाल्या. एका बाजूला शासन राईट टु एज्यूकेशन हे धोरण राबवतं तर दुसऱ्या बाजूला सरकारी शाळा बंद करण्यात येत आहेत यावर त्यांनी चिंता व्यक्त केली. त्यांनी पुण्यश्लोक महाराणी अहील्यादेवी होळकर यांच्या कार्याची महती गायीली. पर्यावरण आणि शेतकऱ्यांच्या हितासाठी जमिनीचा ७/१२ नमुना अहिल्यादेवीने पुरस्कृत केला असे सांगितलं.

याप्रसंगी श्री भरणे यांनी आपले विचार व्यक्त करतांना, भारतीय संविधानाची कलम ३४० यामुळेच मंडल आयोग निर्माण झाला. बहुजनांचे हृदय सम्राट कांशीराम साहेबांचे मंडल आयोग लागू करो आंदोलन हे जइउ च्या हिताचे होते, असे सांगितले.

याप्रसंगी श्री टेकाम यांनी,संत तुकाराम महाराज,संत जगनाडे महाराज यांनी क्रांतीचा मार्ग दाखविला. परिणामी डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधानामुळे या देशातील विषमतावादी तत्व नष्ट होऊन सामाजिक बांधिलकी निर्माण झाली आहे., असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला.

सविता बेदरकर यांनीही मार्गदर्शन केलं, त्या म्हणाल्या की, संत तुकाराम महाराजांच्या गाथांचे पुनर्लेखन संत जगनाडे महाराजांनी केलं आणि त्यामुळे संताजींचा होता माथा म्हणून वाचल्या तुकारामांच्या गाथा ही म्हण समाजात रुजली आहे. या गाथांमुळे अंध श्रद्धा, बुआबाजीचे उच्चाटन होऊन समाजात विज्ञान वाद रूजला असे त्या म्हणाल्या.

यावेळी श्री डोरले, श्रीमती पाटील यांनीही विचार मांडले. याप्रसंगी इंजिनियर पवन दवंडे यांचे समाज प्रबोधन कीर्तनामुळे श्रोते मंडळी मंत्रमुग्ध झाले. दरम्यान रिसिका चंपालाल साठवणे या चिमुकलीने नाटिका सादर केली. तत्पूर्वी शहरात रॅलीचे परिभ्रमण करून संत महापुरुषांचे विचार प्रसारित करण्यात आले.

संत जगनाडे महाराज, महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज आणि डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या छायाचित्रांना माल्यार्पण करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. हा कार्यक्रम बहुजन समाज पक्ष आणि तेली समाज भाईचारा कमेटीच्या वतीने आयोजित करण्यात आला. संत जगनाडे महाराजांच्या स्मृतीप्रित्यर्थ समाज जनजागरण अभियानांतर्गत कही हम भुल न जाए! हे कार्यक्रम संपूर्ण गोंदिया जिल्ह्यात राबविण्यात आले. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी बसपाचे जिल्हा कोषाध्यक्ष आणि तेली समाज संस्थेचे संस्थापक संतोष खोब्रागडे यांनी अथक परिश्रम घेतले. प्रसंगी त्यांनी संचालन करून आभार सचिन गणवीर यांनी मानले.

# जिल्हा प्रशासनाला ग्राहक संरक्षण परिषद स्थापनेचा विसर

**गोंदिया:–** शासन निर्णयानुसार जिल्हा स्तरावर जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेची स्थापना करण्याची तरतूद आहे. परिषदेवर शसकीय व अशासकिय असे ४२ सदस्य असतात. जिल्हास्तरीय ग्राहक संरक्षण परिषदेचे अध्यक्ष जिल्हाधिकारी असतात. या परिषदेचा कालावधी ३ वर्षाचा असतो. मात्र जिल्हा प्रशसनाला ग्राहक संरक्षण परिषद स्थापनेचा विसर पडल्याचे दिसून येते. २४ रोजी ग्राहक परिषदेच्या पदाधिकाऱ्याविनाच राष्ट्रीय ग्राहक दिन साजरा करण्यात आला.

ग्राहक संरक्षण अधिनियम, २०१९ च्या कलम ६ व ८ नुसार ग्राहकांच्या अधिकारांचे संवर्धन व संरक्षण करण्यासाठी राज्य स्तरावर राज्य ग्राहक संरक्षण परिषद व जिल्हा स्तरावर जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदा स्थापन करण्याची तरतूद राज्य शासनाच्या २९ ऑगस्ट २०२२ च्या शासन पत्रानुसार आहे. जिल्हा ग्राहक परिषदेवर शासकीय व अशासकीय सदस्यांची नियुक्ती करण्याची तरतूद आहे. यात जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका, कृषी उत्पन्न बाजार समिती, शाळा, महाविद्यालय, वैद्यकीय व्यवसायीक, व्यापार व उद्योग क्षेत्र, पेट्रोल व गॅस




वितरकांसह शेतकऱ्यांचे प्रत्येकी दोन सदस्य अशा ४२ सदस्यांची निवड परिषदेवर करणे अनिवार्य होते.

जिल्हाधिकारी परिषदेचे अध्यक्ष, पोलिस अधिक्षक व ग्राहक मंचाचे अध्यक्ष हे सदस्य व जिल्हा पुरवठा अधिकारी निमंत्रक राहतील. यासाठी राज्य स्तरावरील किमान एका वृत्तपत्रात इंग्रजी किंवा मराठीत जाहिरात द्यावी, जाहिराती व्यतिरीक्त विभागाच्या संकेतस्थळावर माहिती देणेही आवश्यक होते. मात्र येथील प्रशासनाने एका स्थानिक व कधीकाळीच प्रकाशित होणाऱ्या वृत्तपत्रात जाहिरातही प्रसिद्ध केली. मात्र ग्राहकांच्या संरक्षणार्थ परिषद स्थापन होऊ शकली नाही. शासन निर्णय जारी झाल्यानंतर गोंदिया जिल्ह्यात चार जिल्हाधिकारी झालेत. यात कांदबरी बलकवडे, नयना गुंडे, चिन्मय गोतमारे आणि आता प्रजित नायर या एकाही जिल्हाधिकाऱ्यांनी परिषद स्थापनेची तसदी घेतली नाही. अखिल भारतीय ग्राहक पंचायतीने परिषदेच्या स्थापनेसाठी वारंवार जिल्हा प्रशासनाला निवेदनही दिले तरीही प्रशासन ग्राहकांच्या संरक्षण व हक्काप्रति गंभीर झाले नाही. २४ डिसेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात राष्ट्रीय ग्राहक दिनानिमित्य आयोजित कार्यक्रमात आवर्जुन या परिषदेच्या स्थापनेची आठवण प्रशासनाला ग्राहक पंचायतीच्या पदाधिकाऱ्यांनी करून दिली. मात्र कार्यक्रमाचे अध्यक्षच (जिल्हाधिकारी) या कार्यक्रमाला गैरहजर होते.

# यात्रेदरम्यान भाविकांची कुठलीही गैरसोय होणार नाही त्यादृष्टीने कामे करा-जिल्हाधिकारी प्रजित नायर



## कचारगड यात्रा पुर्वतयारी आढावा

**गोंदिया :-** आदिवासी कुलदैवतेचे श्रध्दास्थान म्हणून कचारगड देवस्थान प्रसिध्द आहे. या ठिकाणी दरवर्षी फरवरी माघ पौर्णिमेनिमित्त पाच दिवसाची गाव जत्राचे आयोजन व आदिवासी महासम्मेलना निमित्त सदर यात्रेस मोठ्या प्रमाणात, झारखंड, बिहार, मध्यप्रदेश, छत्तीसगड, महाराष्ट्र व इतर राज्यातुन भाविक येत असतात. त्यामुळे यात्रेदरम्यान भाविकांची कुठलीही गैरसोय होणार नाही त्यादृष्टीने कामे करा, असे निर्देश जिल्हाधिकारी प्रजित नायर यांनी दिले.

सालेकसा तालुक्यातील कचारगड येथे १० ते १४ फ्रेब्रुवारी २०२५ या कालावधीत यात्रा होणार आहे. या यात्रेच्या अनुषंगाने २४ डिसेंबरला जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात जिल्हाधिकारी प्रजित नायर यांनी पुर्वतयारी आढावा घेतला, त्यावेळी ते बोलत होते. सभेला जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी एम. मुरुगानंथम, जिल्हा पोलीस अधीक्षक गोरख भामरे, निवासी उपजिल्हाधिकारी भैय्यासाहेब बेहेरे, उपविभागीय अधिकारी देवरी कविता गायकवाड, जिल्हा नियोजन अधिकारी सुनिल धोंगडे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी राजन चौबे यांचेसह विविध विभागाचे प्रमुख अधिकारी व कचारगड देवस्थान समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री. नायर म्हणाले, कचारगड यात्रे दरम्यान येणाऱ्या भाविकांची सुरक्षिततेच्या दृष्टीने योग्य ती व्यवस्था करण्यात यावी. यात्रेच्या ठिकाणी नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात यावी. पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, विद्युत अखंडीतपणे सुरु राहील याची दक्षता घ्यावी. विद्युत लाईनच्या खाली दुकाने लावण्यात येऊ नये. वाहनासाठी पार्कींगची व्यवस्था सुनिश्चित करण्यात यावी, औषधांचा पुरवठा पुरेशा प्रमाण ठेवण्यात यावा. यात्रे दरम्यान एस.टी. महामंडळानी बसेसची व्यवस्था करुन त्याचे वेळापत्रक जाहीर करावे. येणाऱ्या-जाणाऱ्या मार्गावर कुणीही नारळ फ्फोडू नये याची दक्षता घ्यावी. भोजनदानमध्ये शिळ्या अन्नाचा वापर होणार नाही याची काळजी घ्यावी. नगर परिषदेने अग्नीशमन वाहनाची व्यवस्था करावी.

यात्रे दरम्यान सीसीटीव्ही कॅमेराची व्यवस्था करण्यात यावी. साफसफाई बाबत ग्रामपंचायतीने व्यवस्था करावी. योग्य त्या ठिकाणी बॅरिकेटींग करण्यात यावे. अनुचित घटना घडू नये यासाठी गॅस सिलेंडर बाबत दक्षता घेण्यात यावी. यात्रेला व्हीव्हीआयपी पाहुणे आले तर गैरसोय होऊ नये म्हणून हेलिपॅडची व्यवस्था करुन ठेवावी. यात्रे दरम्यान शांतता व सुव्यवस्थेच्या दृष्टीने पोलीस विभागाने चोख बंदोबस्त ठेवावा, असे जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी सांगितले.

# जहाल माओवाद्याचे गोंदिया पोलिस दलासमोर आत्मसमर्पण



**गोंदिया:-** सात लाखांचे बक्षीस असलेल्या जहाल नक्षलवाद्याने २६ डिसेंबर रोजी जिल्हा पोलिस दलासमोर आत्मसमर्पन केले. देवा उर्फ अर्जुन उर्फ राकेश सुमडो मुडाम (२७, रा.गुंडम सुटबाईपारा, त. ऊसुर, पोस्टे पामेड, जि. बिजापुर (छ.ग.) असे त्याचे नाव आहे. तो तांडा दलम, मलाजखंड दलम, पामेड प्लाटून- ९, प्लाटून पार्टी कमिटी सदस्य होता.

आत्मसमर्पित माओवादी देवा ऊर्फ अर्जुन ऊर्फ राकेश याचे मूळ गाव बिजापूर जिल्ह्यातील अतिनक्षल प्रभावित भागात असल्याने त्याच्या गावात सशस्त्र गणवेषधारी माओवाद्यांचे येणे जाणे होते. माओवाद्यांच्या भुलथापा व प्रलोभनांना बळी पडून तो लहानपणापासूनच नक्षल चळवळीत सहभागी होवून बाल संघटनमध्ये काम करीत होता. त्यानंतर २०१४ मध्ये तो पामेड दलम (दक्षीण बस्तर), जि. बिजापूरमध्ये भरती झाला व शस्त्र हातात घेतले. पामेड दलममध्ये ६ महिने काम केल्यानंतर सन २०१४ च्या अखेरीस त्याने अबुझमाड एरीयामध्ये अडीच महिन्याचे प्रशिक्षण घेतले.

प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर त्याला २०१५ मध्ये माओवाद्यांचे बस्तर एरीयामधून एम. एस. सी. (महाराष्ट्र-मध्यप्रदेश-छत्तीसगड) झोनकडे पाठविण्यात आले. एम.एम.सी.मध्ये येवून सुरुवातीला त्याने दलम सदस्य म्हणून २०१५ ते २०१६ पर्यंत तांडा दलममध्ये व २०१६ ते २०१७ पर्यंत मलाजखंड दलममध्ये काम केले. त्या दरम्यान मलाजखंड एरियाचा डि.व्ही.सी.एम. चंदू ऊर्फ देवचंद याचा अंगरक्षक म्हणून काम केले. २०१८ मध्ये त्याला परत दक्षीण बस्तर एरियामध्ये पाठविण्यात आले. सन २०१८ ते सप्टेंबर २०१९ पर्यंत (माओवादी संघटना सोडण्यापर्यंत) त्याने पामेड प्लाटून क्रं. ९ मध्ये प्लाटून दलम सदस्य म्हणून काम केले.

आत्मसमर्पीत माओवादी देवा याचा टिपागड गोळीबार (जिल्हा गडचिरोली), झिलमिली काशीबहरा बकरकट्टा गोळीबार (जि. राजनांदगाव, छ.ग.), झिलमिली मलैदा वन कर्मचाऱ्ययांना मारहाण व चौकी जाळपोळ (जि. राजनांदगाव, छ.ग.), हत्तीगुडा घोडापाठ गोळीबार (जि. राजनांदगाव, छ.ग.), किस्टाराम ब्लास्ट (जि. सुकमा, छ.ग.), पामेड गोळीबार (जि. बिजापुर, छ.ग.) आदी गुन्ह्यात सहभागी होता.

नक्षल चळवळीच्या नावाखाली वरिष्ठ कॅडरची चाललेली मनमानी, फंडाच्या नावाखाली चाललेली पैश्याची लुटमार, खोटी ध्येय धोरणे, भुलथापा, प्रलोभने, हिंसा या सर्व बाबीचा खरा चेहरा समोर आल्यानंतर तसेच माओवादी संघटनेत होणारा त्रास व अत्याचारास कंटाळून आणि गोंदिया जिल्हा पोलीसांच्या आत्मसमर्पण संबंधी केलेल्या आवाहनाला प्रभावित होवून त्याने २६ डिसेंबर रोजी जिल्हाधिकारी प्रजित नायर, जिल्हा पोलिस अधीक्षक गोरख भामरे, अपर पोलिस अधीक्षक नित्यानंद झा यांच्यासमक्ष आत्मसमर्पण केले.

# जि.प.च्या १३० शाळांच्या इमारतीवरुन विजेच्या जिवंत तारा

**गोंदिया:-** जिल्हा परिषद शाळांमध्ये गोरगरिबांची मुले शिकत आहेत. विशेष म्हणजे, जिल्ह्यातील १,६४४ पैकी तब्बल १३० शाळांच्या परिसरातून जिवंत वीज वाहिन्या गेल्या आहेत.वादळ वाऱ्यामुळे किंवा जीर्ण झालेल्या जिवंत वाहिन्या विद्यार्थ्यांच्या अंगावर पडण्याचा धोका आहे. हे चिमुकल्यांवरील संकट कायम असून, या जिवंत वीज वाहिन्या हटविण्यासाठी प्रश्न वारंवार पुढे येत असूनही याकडे कुणीच लक्ष द्यायला तयार नाही.

## तिरोडा तालुक्यातील सर्वाधिक शाळांवर वाहिन्या

**चिमुकल्या विद्यार्थ्यांवर संकट ओढावणाऱ्या जिवंत वीज वाहिन्या व रोहित्रांची चौकशी केली असता, तिरोडा तालुक्यातील ३६ शाळांच्या आवारातून वाहिन्या गेल्या आहेत. गोरगरिबांच्या मुलांची काळजी घेण्यासाठी या जिवंत वीज वाहिन्या शाळेच्या परिसरातून हटविण्याची गरज आहे. यासाठी आता १० कोटींच्या घरात रक्कम लागणार आहे.**

## त्यावेळी होता ६.५० कोटींचा खर्च

**जिल्हा परिषदेद्वारा चालविण्यात येणाऱ्या सुमारे १३० शाळांच्या इमारतीवरून वीज वाहिन्या गेल्या आहेत. कित्येक शाळांच्या आवारात रोहित्र लागले आहे. शाळांच्या दृष्टीने हे धोकादायक असल्याने ते काढण्यात यावे, असा प्रस्ताव जि.प. सर्वसाधारण सभेत ठेवला होता. त्यानुसार, वीज मंडळाने कारवाई सुरू करून सर्वेक्षण केले. वीज मंडळाला या कार्यासाठी सहा कोटी ५० लाख रुपये खर्च अपेक्षित असल्याचे सांगण्यात आले. एवढा निधी आणायचा कुठून, हा प्रश्न जिल्हा परिषद व वीज कंपनीपुढे उभा ठाकला होता.**

जिल्हा परिषदअंतर्गत चालविण्यात येणाऱ्या सुमारे १३० शाळांच्या इमारतीवरून विजेच्या जिवंत वाहिन्या गेल्या आहेत. अनेक शाळांच्या आवारातच वीज रोहित्र लावलेले आहेत. हवामानाचा बदल पाहता, कधीही वादळामुळे एखादी जिवंत वाहिनी तुटली, तर मोठा अपघात होऊ शकतो.



म्हणून इमारतीवरील वाहिन्या काढण्यासाठी जिल्हा परिषदेच्या १० ऑगस्ट २०१७ रोजीच्या सर्वसाधारण सभेने ठराव घेण्यात आला होता, परंतु या जिवंत वीज वाहिन्या अजूनपर्यंत हटविण्यात आल्या नाही. त्यावेळी वीज विभागाने सर्वेक्षण करून येणाऱ्या खर्चाचे आराखडे तयार केले होते, पण निधी उपलब्ध नसल्याने हा प्रश्न तसाच पडून होता. त्यानंतर, ऊर्जामंत्री असताना चंद्रशेखर बावनकुळे यांनी निधी उपलब्ध करून देण्याचे मान्य केले होते, परंतु त्यांनीही ते पूर्ण केले नाही.

## लोकशाही दिन ६ जानेवारी रोजी

**गोंदिया :-** शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या २६ सप्टेंबर २०१२ च्या शासन परिपत्रकानुसार जिल्ह्यात सर्व सामान्य जनतेसाठी दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. त्यानुसार सोमवार ६ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ११ वाजता लोकशाही दिनाचा कार्यक्रम जिल्हाधिकारी प्रजित नायर यांचे अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात आयोजित करण्यात आला आहे. लोकशाही दिनानिमित्ताने जिल्हाधिकारी यांचेकडून जनतेच्या तक्रारी, अडचणी व गाऱ्हाणी ऐकून घेण्यात येतील आणि शासनाच्या विविध विभागाचे जिल्हा स्तरावरील प्रमुख अधिकारी यांना त्या संबंधी कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात येतील.

# राईस मीलमुळे वाढले प्रदूषण

## तुमखेडा बु. येथे स्वच्छता अभियानाचा फज्जा, नागरिकांच्या आरोग्याशी खेळ

**गोंदिया:-** गोंदिया-गोरेगाव महामार्गावर असलेल्या तुमखेडा बु. येथे तब्बल १५ ते २० राईस मील आहेत. येथील नागरिक राईस मील्सच्या प्रदुषणाखाली जीवन जगत आहेत. राईस मील्समुळे होणाऱ्या प्रदुषणाने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. तसेच गावात स्वच्छता अभियानाचा फज्जा उडाल्याचे दिसत आहे. या सर्व प्रकाराकडे ग्रामपंचायत व संबंधित विभागाचेही दुर्लक्ष असून नागरिकांच्या आरोग्याशी खेळ सुरु आहे. तालुक्यातील तुमखेडा बु. येथील बहुतेक नाल्यांमध्ये घाण व सांडपाण्यामुळे नाल्या तुडूंब झाल्या आहेत. त्यामुळे नालीतील सांडपाणी गावातील रस्त्यावरुन वाहात असल्याचे दिसून येते. तसेच ग्रामपंचायत प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे ग्राम स्वच्छता अभियानाचे तीनतेरा वाजले आहेत.

गावातील वॉर्डामध्ये सर्वत्र घाण पसरली असून नाल्यांमध्ये केरकचरा साचल्याने सांडपाण्याचा निचरा होत नाही. त्यामुळे नालीतील पाणी रस्त्यवर येऊन गावकऱ्यांची रहदारी बाधित होत आहे. याशिवाय गावकऱ्यांना राईस मील्समुळे होणाऱ्या प्रदुषणाचा सामना करावा लागत आहे. सदर प्रकारामुळे ग्रामस्थांचे आरोग्य धोक्यात आले आहे. गावाची लोकसंख्या २ हजार ६०० असून स्वच्छ भारत अभियानाचा गावात फज्जा उडविला जात आहे. ग्रामपंचायतकडून कचरा जमा करण्याचा कचरापेटी व घंटागाडीची सुविधा उपलब्ध करण्यात आली नाही. त्यामुळे केरकचरा सर्वत्र पसरलेला दिसतो. राईस मील्सचा धूर व धूळ उडून ग्रामस्थांच्या घरापर्यंत येतो. ही समस्या अनेक दिवसांपासून कायम आहे.



## गावकऱ्यांची पाण्यासाठी पायपीट

**गावकऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, अनेक वर्षापासून गावात पाणीपुरवठा योजना उपलब्ध नाही. त्यामुळे बोअरवेलच्या माध्यमातून गावातील लोक पिण्याचे पाणी मिळवितात. त्यातच काही बोअरवेल बिघडलेल्या स्थितीत असून त्यांची सुधारणा अद्यापही करण्यात आलेली नाही. गावातील वयोवृद्ध नागरिकांच्या आरोग्याकडे बघून गावाला प्रदुषणमुक्त करण्याची मागणी गावकऱ्यांनी केली आहे.**

# एमआयडीसीत नवे उद्योग नाहीत; जुनेही पडले बंद

## ९८ पैकी ५३ उद्योगांना टाळे, केवळ ७०० जणांना मिळतोय रोजगार

**गोंदिया:-** जिल्ह्यात आठ तालुके असले,तरी केवळ चारच तालुक्यात एमआयडीसीत मोजके उद्योग सुरु आहेत. एकेकाळी वैभव असलेली गोंदिया येथील एमआयडीसी सुद्धा आता नावापुरतीच राहिली आहे. येथे उद्योग सुरु होण्याऐवजी बद पडत असल्याने ९८ पैकी ५६ उद्योग बंद पडले आहेत. केवळ ४५ उद्योग सुरु असून, त्यातून केवळ ७०० जणांना रोजगार मिळत आहे. तर उद्योगांसाठी राखीव असलेल्या प्लाटवर केवळ उद्योजकांनी कब्जा करुन ठेवला असून, त्यावर कुठलाही उद्योग सुरु न केल्याने गोंदिया एमआयडीसी केवळ नाममात्र ठरत आहे.




गोंदिया जिल्ह्यातील अर्थव्यवस्था ही प्रामुख्याने शेतीवर आधारित आहे. या भागात सर्वाधिक धानाचे उत्पादन घेतले जाते. त्यामुळे येथे धानावर आधारित राईस मिल उद्योग सर्वात मोठे उद्योग आहे. जिल्ह्यात जवळपास १५५ वर राईस मिल आहे. येथील तांदळाची देश व विदेशात निर्यात केली जाते. गोंदिया येथील एमआयडीसीमध्ये सुद्धा राईस मिल उद्योग मोठा होता. तर धानाच्या कोड्यांपासून वीज तयार करण्याचा प्रकल्प एमआयडीसीत सुरु होता. पण, गेल्या चार-पाच वर्षापासून तो सुद्धा बंद पडला आहे. परिणामी अनेकांचा रोजगार बुडाला. येथील एमआयडीसीत उद्योगांसाठी १४६.१४ हेक्टर जागा उपलब्ध करुन देत १९७ प्लॉट उद्योगजकांना विविध उद्योगांसाठी उपलब्ध करुन देण्यात आले.

**गोंदिया येथील एमआयडीसीत उद्योग स्थापन होण्यासाठी शासनाने सोयी सुविधा उपलब्ध करुन त्यासाठी अनुकूल धोरण करण्याची गरज आहे. तसे केल्यास मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होईल व उद्योगांना चालना देण्यात मदत होईल.**

**हुकूमचंद अग्रवाल, अध्यक्ष एमआयडीसी गोंदिया**

त्यापैकी ११० प्लॉटवर राइस मिल, प्लास्टिक प्लांट, स्वमी नस प्रकल्प, छोटे-छोटे इतर उद्योग सुरु करण्यात आले होते.

पण कालांतराने विविध अडचणींमुळे यातील अनेक उद्योग बंद पडले. त्यामुळे सद्य: स्थितीत येथे केवळ ४५ उद्योग सुरु आहेत. यातही सर्वाधिक राइस मिलचा समावेश असून, त्यामुळे ७०० जणांना रोजगार उपलब्ध असल्याची माहिती एमआयडीसीच्या अधिकाऱ्यांनी दिली. गेल्या आठ-दहा वर्षात एमआयडीसीत एकही नवीन उद्योग स्थापन झाला नाही. उलट ते उद्योग सुरु होते. त्यापैकी काही बंद झाले आहे. काही उद्योगांना कुशल रोगिर न मिळाल्याने ते बंद पडल्याची माहिती आहे. त्यामुळे येथील एमआयडीसी केवळ नाममात्र ठरत आहे.

| | |
|---|---|
| **एमआयडीसीचे एकूण क्षेत्र-** | **१४६.१४ हेक्टर** |
| **एकूण उद्योगांची संख्या** | **९८** |
| **उद्योगांसाठी उपलब्ध करुन दिलेले प्लॉट** | **१९७** |
| **सद्य:स्थितीत सुरु असलेले उद्योग** | **४५** |
| **सध्या होत असलेली रोजगार निर्मिती** | **७००** |

## उद्योगाच्या नावावर प्लॉटवर कब्जा

**एमआयडीसीमध्ये उद्योग सुरु करण्यासाठी उद्योजकांना प्लॉट उपलब्ध करुन देण्यात आले. यापैकी कित्येकांनी गेल्या वीस-पंचवीन वर्षापासून त्या ठिकाणी कुठलाच उद्योग सुरु केला नाही. केवळ प्लॉटवर कब्जा करुन ठेवला आहे. मात्र त्यांच्यावर एमआयडीसी प्रशासनाकडून कुठलीच कारवाई करण्यात आली नाही.**

## अनेक भूखंड रिकामे

**एमआयडीसीत उद्योगासाठी एकूण १४६ हेक्टर जागा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. पण यापैकी अनेक भूखंड गेल्या वीस ते २५ वर्षापासून रिकामे पडले आहेत. त्यांचा कसलाही उपयोग होत नसल्याचे चित्र आहे. तर, या ठिकाणी उद्योग स्थापन व्हावे, यासाठी कुठलच प्रयत्न केले जात नसल्याचे चित्र आहे.**

## ....तर १५ हजार जणांना मिळेल रोजगार

**येथील एमआयडीसीतील उद्योग पूर्णक्षमतेने सुरु झाल्यास १५ हजारांवर बेरोजगारांना रोजगार मिळू शकतो, पण येथील अनेक उद्योग बंद पडले असल्याने अनेकांना रोजगाराच्या शोधात पुणे, मुंबई, नागपूर येथे धाव घ्यावी लागत आहे.**

# अधिकाऱ्यांच्य हलगर्जीपणामुळे ग्रा.पं.कर्मचारी वेतनापासून वंचित

## ५ जानेवारीपर्यंत मागणी पूर्ण करा, ग्राम पंचायत कर्मचारी महासंघ

**गोंदिया:-** पंचायत समिती गटविकास तथा विस्तार अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे तालुक्यातील ११० ग्रामपंचायतमध्ये कार्यरत १६८ कर्मचारी ऑक्टोबर ते नोव्हेंबर पर्यंतच्या वेतनापासून वंचित आहेत. एवढेच नाही तर अनेक कर्मचाऱ्यांना एप्रिल ते ऑगस्ट २०२४ या ५ महिन्यांचे वेतन मिळाले नाही. परिणामी ते अडचणीत आले आहेत. ५ जानेवारीपर्यंत त्यांचे वेतन देण्यात यावे अशी मागणी महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत कर्मचारी महासंघाने केली आहे.

महाराष्ट्र शासनाकडून ग्रामपंचायतचे उत्पन्न व कर वसूलीच्या आधारावर वेतनावर अनुदान दिले जात आहे. हे वेतन जिल्हा परिषदेद्वारे पंचायत समिती मार्फत कर्मचाऱ्यांच्या बँक खात्यावर जमा केले जाते. या खर्चाची रक्कम पंचायत समितीकडे महिनाभरापासून जमा असून येथील गटविकास व विस्तार अधिकारी त्यांच्याकडे सातत्याने दुर्लक्ष करीत आहेत. ज्यामुळे कर्मचाऱ्यांना आर्थिक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. अशात कर्मचाऱ्यांचे वेतन ५ जानेवारी पर्यंत देण्यात यावे अशी मागणी महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत कर्मचारी महासंघाचे राज्य कार्याध्यक्ष मिलिंद गणवीर यांनी केली आहे.

## ९ महिन्यांच्या फरकाची रक्कमही दिली नाही

**राज्याच्या ग्राम विकास विभागाचे १९ महिन्यांच्या वेतन फरकारच्या रकमेतून ९ महिन्यांच्या वेतन फरकाची रक्कम दिवाळी पुर्वी अदा करण्याचे स्पष्ट निर्देश होते. त्यावेळी कर्मचाऱ्यांच्या आर्थिक मजबुरीच फायदा घेत महासंघाचे कार्यकर्त्यांना सतत ८ दिवस पं.स.कार्यालयात बोलावून वेतन ऑनलाईन प्रक्रिया पूर्ण करवून घेतली. त्यानंतर या कर्मचाऱ्यांना वेतन मिळाले. आता १० महिन्यांच्या वेतन फरक (एरियस) व इतर वेतनासाठी अशाच प्रकारे कामे करवून घेण्याचे प्रयत्न करीत आहेत.**

## कामबंद आंदोलनाचा दिला इशारा

**पंचायत विभागात तीन विस्तार अधिकारी, लिपिक व तीन कॉम्प्युटर ऑपरेटर आहेत. परंतु यांच्याकडून कामे करवून न घेता ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांकडून आपल्या जबाबदारीची कामे करवून घेतली जातात. ५ जानेवारी पर्यंत सर्वप्रकारची रक्कम कर्मचाऱ्यांच्या खात्यावर जमा न झाल्यास कामबंद आंदोलन करण्याचा इशारा महासंघाचे तालुकाध्यक्ष देवेंद्र मेश्राम व सचिव विनोद शहारे यांनी दिला आहे.**




# सरपंच हत्या प्रकरणाच्या निषेधार्थ जिल्ह्यातील ग्रामपंचायतीचे कामकाज बंद

**गोंदिया :-** बीड जिल्ह्यातील सरपंच हत्या प्रकरण, धाराशिव जिल्ह्यातील सरपंचाला पेट्रोलने जिवंत जाळण्याचा प्रयत्न यासह राज्यात सतत सरपंचांवर होणारे जीवघेणे हल्ले अशा घटनांच्या निषेधार्थ जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींचे कामकाज आज, दि. ३१ डिसेंबरपासून २ जानेवारी बंद ठेवण्यात आले. आज, पहिल्या दिवशी जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींचे कामकाज कडकडीत बंद होते. दरम्यान, या आंदोलनामुळे गावगाडा ठप्प पडला असून, अनेक नागरिकांची कामे प्रभावित झाली. गोंदिया जिल्हा सरपंच संघटनेच्या नेतृत्वात हे आंदोलन सुरू करण्यात आले आहे.

बीड जिल्ह्यातील मस्साजोग या गावचे सरपंच संतोष देशमुख ज्यांनी ग्रामपंचायतीला विकासकामांच्या संदर्भात अनेक पुरस्कार मिळवून दिले, गावाचा विकास करण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले अशा सरपंचाचे अपहरण करून त्यांची हत्या करण्यात आली. ही घटना ताजी असतानाच पुन्हा सरपंचावरील जीवघेण्या हल्ल्याच्या दुसऱ्या घटनेने महाराष्ट्र हादरला. धाराशिव जिल्ह्यातील सरपंचाच्या कारची तोडफोड करून पेट्रोलने जिवंत जाळण्याचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना समोर आली. लोकशाही तथा पुरोगामी महाराष्ट्राच्या अस्मितेला गालबोट लावणाऱ्या अशा घटना तत्काळ थांबल्या पाहिजेत, यासाठी सरपंच संघटना आक्रमक झाली. संघटनेने या घटनांचा निषेध म्हणून जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींचे कामकाज ३१ डिसेंबरपासून २ जानेवारीपर्यंत बंद ठेवण्याचे आवाहन केले होते. या आवाहनाला सरपंच व सदस्यांनी शंभर टक्के प्रतिसाद देत ग्रामपंचायतींचे कामकाज बंद ठेवले.

सरपंच देशमुख हत्या प्रकरणातील आरोपींना फाशीची शिक्षा द्यावी, सरपंच सुरक्षेसाठी शासनाने विशेष कायदा करावा, सरपंच व पदाधिकाऱ्यांना विमा संरक्षण देण्यात यावे, सरपंच तथा ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांना कायदेशीर संरक्षण द्यावे, मृत सरपंचाच्या कुटुंबाला आर्थिक मदत करावी आदी मागण्यांसाठी हे आंदोलन सुरू करण्यात आले आहे.

महाराष्ट्र राज्य हा लोकशाहीयुक्त पुरोगामी राज्य असून अशा राज्यामध्ये सरपंचाची निर्घृणपणे हत्या होणे ही लोकशाहीला काळीमा फासणारी बाब आहे. त्यामुळे या घटनेचा निषेध म्हणून व निष्पक्ष चौकशी करण्यासाठी सरपंच संघटनेने पुकारलेल्या कामबंद आंदोलनाला ग्रामपंचायत अधिकारी संघटनेने पाठिंबा दिल्याचे जिल्हाध्यक्ष कमलेश बिसेन यांनी सांगितले.

# पार्सल पालकमंत्र्यांच्या नियुक्तीकडे लक्ष?



**गोंदिया :-** फडणवीस सरकारातील मंत्रालयात गोंदिया जिल्ह्याला स्थान मिळाले नाही. त्यामुळे जिल्ह्याला परजिल्ह्यातीलच पालकमंत्री लाभणार, हे निश्चित झाले आहे. परंतु, अद्यापपर्यंत पालकमंत्र्याची नियुक्ती करण्यात आली नाही. त्यामुळे या विषयी जिल्हा वासीयांमध्ये उत्सुकता लागली आहे. राजकीय पटलावर पालकमंत्री पद राष्ट्रवादी कॉँग्रेसकडे राहणार? असे मानले जात आहे. तर दुसरीकडे भाजप कार्यकर्त्यांकडून पालकमंत्री भाजपकडे रहावा, अशी इच्छा व्यक्त केली जात आहे.

२३ नोव्हेंबर रोजी सार्वत्रिक विधानसभा निवडणुकीचा निकाल जाहिर झाला. जिल्हयासह राज्यातील जनतेने महायुतीला सत्तेचे जनादेश दिले. एकतर्फी बहुमत असतानाही तब्बल १२ दिवसानंतर महायुतीने सरकार स्थापित केले. देवेंद्र फडणवीस यांनी ५ डिसेंबर रोजी मुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. त्याचबरोबर दोन उपमुख्यमंत्री झाले. त्यानंतर तब्बल १८ दिवसानंतर मंत्रिमंडळाचा विस्तार करण्यात आला. मंत्रिमंडळात ३३ कॅबिनेट व सहा राज्यमंत्री असे एकूण ३९ मंत्र्यांनी शपथ घेतली. मात्र खातेवाटपही सहा दिवस रखडले.

विभागविना मंत्र्यांच्या उपस्थितीत राज्य सरकारचे हिवाळी अधिवेशन पार पडले. २२ डिसेंबर रोजी मंत्र्यांना खातेवाटप करण्यात आले. परंतु, अद्यापही पालकमंत्र्यांची नियुक्ती करण्यात आली नाही.

दुसरीकडे लोकसभा व विधानसभा निवडणुका पार पडल्यापासून जवळपास ६ महिन्यांपासून जिल्ह्यातील विकासकामे रखडली आहेत. जिल्हा नियोजन समितीचे कामेही अत्यंत संथगतीने सुरू आहेत. जिल्हा नियोजन समितीच्या वार्षिक नियोजनातील निधीही खर्चित झालेला नाही. अनेक लेखाशिर्षकातंर्गत प्रस्तावित कामे निधी अभावी रखडली आहेत. त्यामुळे पालकमंत्री केव्हा नियुक्त होणार आणि विकासकामांना गती मिळणार, याकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

गोंदिया जिल्ह्याला नेहमीप्रमाणे आगामी वर्षासाठी परजिल्ह्याचे पालकमंत्री लाभणार, हे निश्चित आहे. परंतु, जिल्ह्याचे पालकत्व कोणत्या पक्षाच्या मंत्र्याकडे सोपविण्यात येणार, हे अद्यापही गुलदस्त्यात आहे. राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्ष महायुतीचा एक घटक पक्ष आहे. त्यामुळे गोंदिया जिल्ह्याचे पालकत्व राष्ट्रवादीच्या मंत्र्याकडेच राहणार, असे राजकीय वर्तुळात चर्चा आहे. दुसरीकडे गोंदियाचे पालकत्व भाजपकडे रहावे, यासाठी भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते आग्रही आहेत.

## तीन मंत्र्यांची नावे चर्चेत

**साधारणत: गोंदिया जिल्ह्याचे पालकत्व राष्ट्रवादी कॉँग्रेसकडे राहणार, असे मानले जात आहे. त्यामुळे राष्ट्रवादीच्या कोट्यातील तीन मंत्र्यांची नावे चर्चेत आहेत. राज्यमंत्री इंद्रनिल नाईक, कॅबिनेट मंत्री अदिती तटकरे व कॅबिनेट मंत्री हसन मुश्रीफ यांच्यापैकी एकाच्या खांद्यावर गोंदिया जिल्हयाच्या पालकत्वाची जबाबदारी राहणार? अशी चर्चा आहे. याशिवाय इतर कोणताही मंत्र्यालाही जबाबदारी सोपविण्यात येवू शकते, असेही मानले जात आहे.**

## तर कामांना मिळणार गती

**पालकमंत्री हे जिल्हा नियोजन समितीचे पदसिध्द अध्यक्ष असतात. जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून जिल्ह्यातील विकासकामांचे नियोजन केले. त्यासाठी निधीही उपलब्ध करून दिला जातो. सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाचे नियतव्यय असले तरी अद्यापही मोठ्या प्रमाणात निधी खर्चित झालेला नाही. त्यामुळे पालकमंत्री नियुक्त झाल्यावरच विकासकामांना गती मिळणार, असे बोलले जात आहे.**